

गोऱ्या साहेबानेही सलाम करावा अशा फडर्या इंग्रजीमध्ये पाच हजार पृष्ठांचा दर्जेदार मजकूर लिहिणाऱ्या या कलमबहाद्दराने आत्मचरित्रपर अशी दोन बोटांची चिट्ठी लिहिली.

नाव – दीनानाथ गोपाळ तेंडुलकर
जन्मतिथी – ९–१०–१९०९
शिक्षण – बी. ए.

जन्मस्थळ – रत्नागिरी
व्यवसाय – लेखन

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २६ जून १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | चार | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार....**

▫ 'भूमिपुत्र' या संज्ञेला पात्र ठरलेल्या एका महान् जीवनाचं दर्श घडून समाधान वाटलं–एवढ्याचसाठी की भारतमातेची कुस अजू खूप समृद्ध आहे–ज्यात अजून अशी रसरशीत, धगधगीत जीवने जन्मत आहेत–नष्ट होत आहेत–पुन्हा जन्मण्यासाठी.

वाईट वाटलं–अशासाठी की असं सुष्ट जीवन नष्ट करणाऱ्या दुष्ट वृत्तींविरुद्ध लढण्यासाठीही आपण संघटीत होत नाही. आजकाल संघटीत आहेत फक्त अन् फक्त दुष्ट वृत्ती–(कशाही पोटी असेनात). अन् सत्प्रवृत्ती झगडत आहेत आपसातच बुद्धिवादाच्या नसत्या जंजाळात गुंतून.

अन् लाज वाटली याची की हे वाचून आम्ही संतापतो. पेटतो. पण क्षणभरच. दुसऱ्या क्षणी विसरून जातो. (का विझून?)

अन् असं चालायचंच असं म्हणत (खोटचा) समाधानापोटी निःश्वास टाकतो!

पण हे दुष्ट चक्र थांबलं तर पाहिजे! कोण थांबवणार? जे थांबव ण्याचा प्रयत्न करतात ते नष्ट केले जातात–केले जाणार आहेत असे कारण आपण सारे भ्याड, कातडीबचाऊ बनलो आहोत–

–आपण फक्त–जोपर्यंत उभारणार स्मारके, गाणार गीते अन् कर्तव्

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतील असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

पूर्तीच्या आनंदात झोपी जाणार ! --असे आहोत तोपर्यंत अशा अनेक भूमिपुत्रांचं बलिदान होत रहाणार आहे--पुन्हा-पुन्हा.

जोपर्यंत त्यांच्या रक्ताचं चैतन्य खेळवणारे जन्मत नाहीत अन् घडवत नाहीत क्रांती--या भूमीत--तोपर्यंत एकच इच्छा--(तीही दुबळी कृतिशून्य !) तो मुक्तीचा क्षण येईपर्यंत निदान आपल्या भारतमातेची कुस अशीच समृद्ध राहो.

या पवित्र बलिदानासाठी लागणाऱ्या भूमिपुत्रांना जन्म देत युगानुयुगे !

५ जून, १९७१ सुहास बाक्रे, ठाणे

□ आम्ही एक गुजराती साप्ताहिक चालवितो. नाव 'रणहाक'. प्रथम वर्ष संपून नुकतेच दुसऱ्या वर्षात पदार्पण केले आहे. जून महिन्याचा पहिला आठवडा आमचा वाढदिवस आठवडा. ट्रेडल यंत्रावर आमचे अंक निघतात. सिलींडर घेऊन ठेवलेले आहे.

आपला अकराव्या वर्षाचा प्रथम अंक वाचला. आपला दोघांचा वाढआठवडा एकच. आपला हा अंक माझ्यासारख्या ध्येयवेड्या संपादकाला बराच...म्हणजे चांगलाच धीर देऊन गेला. माझ्या लिखाणांत, अग्रलेखांतून विनोबा, नेहरू, गिरी, गव्हर्नर, गांधी या साऱ्यांना मी चांगलेच बडविले आहे -- पूर्वग्रहातून नव्हे तर तर्क आणि बुद्धि यांना कौल लावून, श्रद्धा थोडी पण ती अंध नाही असा माझा पिंड. डॉक्टर लोहियांच्या पठडीत तयार झालो पण त्यांच्याशीसुद्धा तर्कावर भांडून ६३ साली पक्ष सोडला. २५ वर्षांच्या राजकीय जीवनावर पाणी सोडून बाहेर पडताना वेदना होत होत्या पण समाजवादाचा गड्डा असा लोहिया जर समाजवाद अंमलात आणणार नसेल तर हा देव मातीचा म्हणून मी याला पाण्यात बुडविला. ३५ पैसे दरडोई उत्पन्नवाल्यांचा हा देश. त्याचा लोकसभेचा प्रतिनिधी तिसऱ्या वर्गाने जावा हा माझा आग्रह. काँग्रेसवर टीका करून आपण मात्र आराम करायचा हा समाजवादी खाक्या आपल्याला नापसंत. ६३ च्या फरुकाबादच्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीनंतरच्या मुंबईतील कार्यकर्त्यांच्या सभेत डॉक्टरांना हा प्रश्न विचारला. त्यांचे मासलेवाईक उत्तर ऐकले आणि 'तुम्ही समाजवादी नाहीत' असे डॉक्टरांना सांगून पक्ष सोडला. लिमये, फर्नांडीस, यांच्याशी पण या बाबतीत बोललो पण मधूसुद्धा मातीचा देव निघाला. १९६७ ची निवडणूक -- लोकसभेची -- तिसऱ्या वर्गाने प्रवास आणि शस्त्रस्वातंत्र्य व शिक्षणात समानता या मुद्यावर लढवली. गाठचे ५००० रुपये यात खर्च केले. हरलो -- डिपॉझीट गेले. आपले वर्तमानपत्र असल्याशिवाय प्रचार नीट होणार नाही म्हणून तुटपुंज्या साधनांनी प्रेस सुरू केला. जॉब कामे घेतली. वर्तमानपत्राची छपाई फुकट होऊ शकेल असा विश्वास आला आणि १९७० च्या जूनमध्ये साप्ताहिक सुरू केले. एका वर्षात दहा हजार रुपयांच्या कर्जाचे ओझे घेऊन दुसऱ्या वर्षात प्रवेश केला. या ५२ अंकांनी लोकांना प्रभावित

केले आहे पण अजून नुकसानीचा बडगा एकाद्या वर्षापर्यंत तरी पाठ सोडणार नाही. आपल्या स्वामीजींनी उत्तर प्रदेशच्या खेड्यात हे सारे केले. एका सायक्लोस्टाईल-वर केले. माझे दुर्भाग्य की या अशा तेजस्वी व्यक्तीचा मला पत्ता लागू शकला नाही. त्यांच्याशी एखादी मुलाखत जर झाली असती तर प्रचंड शक्तीचे अमृत ... हो अमृतच...घेऊन आलो असतो. आपल्या 'माणूस'ने उशिरा का होईना स्वामीजींच्या कार्याशी माझी मुलाखत घडविली. आपले आभार.

१३ जून १९७१ — बाळ शाह, मुंबई

## मातीचा गुण का दृष्टी दोष?

¤ आपल्या ५ जूनचे अंकात आपण एका भूमिपुत्राचे चरित्र दिले आहे. चरित्र फार सुंदर आहे. त्याचे मृत्यूनंतर आपले विचार पान २१ वर आपण व्यक्त केले आहेत. त्यात गंगाकाठची मातीच मनुष्याला मवाळ करते असा गुण त्या मातीत आहे हा शोध लावला आहे, व त्याची काही ऐतिहासिक उदाहरणे दिली आहेत. इतिहास-तज्ञ त्याची दखल घेतील अगर न घेतील. मालेगावच्या दंग्याबद्दल अत्यंत कठोर-पणाने लिहिणारे लो. टिळक यांनी लखनौला मुस्लीम लीगबरोबर समझोता केला, हा त्या मातीचा गुण म्हणून आपण उल्लेख केला. त्याचमुळे कै. जवाहरलाल नेहरूंनी मुसलमानांना अधिक प्रेमाने वागवले असे आपण म्हटले. आपला कल सध्याचे काँग्रेसला झुकते माप देण्याकडे आहे हे करिअप्पांवरील आपले विकृत लिखाणाने स्पष्ट झाले होतेच. तो आपला वैयक्तिक प्रश्न आहे. आपण लोक-मान्यांवर मात्र अन्याय केला आहे. ब्रिटिशांच्या फोडा व झोडा या भेदनीतीची त्यांनी योग्य दखल घेऊन काँग्रेस-मुस्लीम लीगची एकमुखी मागणी करण्याचा त्या पाठीमागे त्यांचा हेतू होता.

मालेगावच्या दंग्याच्या वेळी हिंदूंचा प्रश्न घेऊन सरकार जर मुसलमानांना फूस देत असेल तर हिंदूही (मुस्लिमांना) त्याच भाषेत उत्तर देतील, अशा तऱ्हेचा व हिंदु बांधवांना समर्थक असा लेख लोकमान्यांनी लिहिला. बनारसला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेस जाताना १९२० मध्ये म. गांधींनी टिळकांना खिलाफत प्रकरणी मुसलमानांचे सभेला येण्याचा आग्रह केला होता. त्यावेळी हा प्रश्न त्यांचा धार्मिक आहे, त्यांत परधर्मीयांची लुडबूड नको, असे सांगून टिळकांनी गांधींना नकार दिला. लोकमान्यांवर गंगाकाठचे मातीचा काहीही परिणाम झाला नाही.

९ जून १९७१ — म. रा. कुलकर्णी, मुंबई

[ करिअप्पांवरील विकृत लिखाणाने 'माणूस'चे सध्याचे काँग्रेसकडे झुकलेले माप स्पष्ट झाले हे नव्हते बुवा आपल्या ध्यानात आले ! 'हा आंबा उतरलेला आहे' या वाक्याचा अर्थ 'चिंचा-पेरू खा' असा कोणी लावला तर संपादकाच्या सोडा, ब्रह्मदेवाच्या तरी काय ध्यानात येऊ शकणार म्हणा ! —सं. ]

■ ...श्री. मोरेश्वर दाते यांनी ३१ मेच्या आपल्या पत्रात नक्षलवाद्यांना वाट चुकलेले तरुण म्हटलेले आहे. पण प्रत्यक्षात सामाजिक क्रांतीची वाट त्यांनाच सापडली आहे असे आढळते. मी तर त्यांना वाट सापडलेले तरुणच म्हणेन.

विनोबाजी, बाळ ठाकरे प्रक्षोभक विधानं करतात, त्यांच्याविरुद्ध कृती केली जात नाही, नक्षलवाद्यांना मात्र ठेचायची भाषा बोलली जाते. कारण उघड आहे, ठाकरे, विनोबा फक्त विधानंच करतात. तर नक्षलवादी प्रत्यक्ष कृती करतात. आज शासनाला धोका आहे अशा क्रियाशील लोकांपासून, वाचाळ लोकांपासून नाही. लक्ष भोजनं घालणाऱ्यांच्या नावानं आम्ही लोक फक्त शिव्या मोजू, चर्चा करू, पत्र खरडून वृत्तपत्रांचे रकाने भरू; फार तर 'साल्यांना फासावर चढवले पाहिजे' असं संतापून बोलू. पण नुसत्या गप्पाच! लक्षभोजनवाल्यांना प्रत्यक्ष फासावर चढवतील नक्षलवादीच! मला वाटते, यातच दात्यांच्या प्रश्नाचं उत्तर सामावलं आहे.

असो. अनिल बर्व्यांच्या अटकेमुळे पुनश्च नक्षलवाद म्हणजे काय? नक्षलवादी मानवतेचे शत्रू की मित्र? देशद्रोही की देशप्रेमी? इ. प्रश्नांचा सर्वांनीच गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. मला स्वतःला खालील प्रश्न रोजच्या रोज भंडावून सोडत आहेत. त्याची कुणी उत्तरे देईल काय?

१ : लोकशाही देशात एखाद्या वाङ्मयावर केवळ ते सरकारविरोधी आहे म्हणून बंदी घालता येते काय?

२ : एखाद्या तत्त्वज्ञानाची उघड चर्चा करणे, त्याविषयीची पुस्तके बाळगणे हा गुन्हा होऊ शकतो का?

३ : एखाद्या विचारप्रणालीचा लेखनाद्वारे उघड प्रचार करणे. त्याविषयी भित्तीपत्रके लावणे इ. आरोपांवरून अटक होऊ शकते काय?

४ : 'लोकहो, उठाव करा, सरकार हाणून पाडा' असे आदेश देऊन सरकार कोसळते काय?

५ : सरकारविरुद्ध जनमत मूठभर लोकांच्या चिथावणीने निर्माण होते की सरकारी कृतीमुळे आपणहूनच निर्माण होते?

६ : एखादा तरुण परकीय भूमीवर प्रेम करीत असेल म्हणजे तो मायभूमीचा द्वेष करीत असेल असे समजावे काय?

७ : ज्या शिताफीने पोलीस अधिकाऱ्यांनी अनिल बर्व्यांना पडकले त्याच शिताफीने गुंड, थिएटरसमोर उघड काळाबाजार करणाऱ्यांना पकडता येत नाही काय?

वरील प्रश्नांना उत्तरे नसतील तर 'कायदा' व 'न्याय' इ. शब्दांच्या व्याख्या बदलण्याची वेळ आली आहे असे नाईलाजाने म्हणावे लागेल.

१२ जून, १९७१ — अवधूत परळकर, मुंबई

छोटबाबू

# दिल्लीवार्ता

## परदेशयात्रेची सुवर्णसंधी ...मंत्रीगणहो नावे नोंदवा.

नेमेचि येणाऱ्या पावसाने देशात अन्यत्र गारवा निर्माण केला असला, मातीचा गंध दरवळून टाकला असला तरी दरवर्षीप्रमाणेच राजधानी अजून तापलेली आहे.

काँक्रिटचे आणि डांबरी रस्ते चटचटत आहेत. त्यामुळे एअर कंडिशण्ड कारमधून बाहेर पडण्याऐवजी एअर कंडिशण्ड घरातून बसणे मान्यवर समाजवादी मंत्री अधिक पसंत करतात.

पण तरीही अंगाची लाही होतेच.

म्हणूनच की काय बंगला देशच्या निमित्ताने परदेशची वारी करण्याची आयडिया निघाली आहे.

रेल्वे, विमानाचे दर वाढले असले तरी त्याची पर्वा इतरांना, मंत्र्यांना त्याचे काय हो ?

बंगला देशमधील परिस्थितीमुळे आणि विशेषत: लाखो निर्वासितांमुळे भारतावर होणाऱ्या अनिष्ट परिणामांची जगातील इतर देशांना कल्पना देण्यासाठी मंडळी जाणार आहेत.

जणू काही या देशातून आमच्या वकिलाती झोपी गेल्या आहेत. आमचे वकील डुलक्या घेत आहेत. या देशांची सरकारे टाईम, लाईफ, न्यूयॉर्क टाईम्स, वॉशिंग्टन पोस्ट, गार्डियन, इंटरनॅशनल, हेराल्ड ट्रिब्यून किंवा स्थानिक वर्तमानपत्रे वाचत नाहीत. रॉयटर्स, असोसिएटेड प्रेससारख्या जागतिक वृत्तसंस्थांच्या वार्ताहरांची बातमीपत्रे जणू काही या वर्तमानपत्रांच्या संपादकांच्या टोपलीत जाऊन पडतात.

फक्रुद्दिन अलि अहमद, शाह नवाज खान आणि राजस्थानचे एक मंत्री बरकत अली पश्चिम आशियातील देशांची मनं भारताच्या बाजूने वळवणार आहेत. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या 'मन वळावू' महात्म्यांना अजिबात करता आले नाही, ते हे त्रिकूट करू पहात आहे—आणि देशाच्या राजनैतिक मोहिमेवर राजस्थानसारख्या एका राज्याचा मंत्री कोणत्या भूमिकेवरून ? मुस्लिम देशांची मने वळवायला मुस्लिम प्रतिनिधीच हवा म्हणून ?

मोहन कुमारमंगलम् पूर्व युरोपची आघाडी सांभाळणार आहेत. स्वर्णसिंगानी मॉस्कोत केलेले प्रयत्न यशस्वी झाले असते तर तेथील वकिलातीतून केवळ पत्रोपत्री करूनही करता आले असते तेच काम करण्यासाठी खास मंत्री रवाना होतो आहे.

विद्याचरण शुक्ला एवीतेवी स्कँडिनेवियाला जाणार होतेच, आता त्यांना आणखी थोडे पुढे जावे लागणार आहे.

अर्थातच रात्रंदिवस भाषणं करणाऱ्या आमच्या मंत्र्यांना परदेशी मुत्सद्यांशी दुभाष्याद्वारे थोडी अधिक बोलणी करणे जड जाणार नाही. अहोरात्र मेहनतीची आणि निवडणूक प्रचाराच्या उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने लांबवर दौरे काढण्याची सवय असल्याने परदेश दौऱ्यांचे ओझे खांद्यावर घ्यायला अडचण पडायची नाही.

प्रश्न असा आहे, या मोहिमेचा खरोखरच काही फायदा होणार आहे का? स्वर्णसिंग, डॉ. करणसिंग, सिद्धार्थ शंकर रे आणि जयप्रकाश नारायण यांच्या मोहिमातून तरी हाताशी काय लागले?

एखाद्या समस्येवर परराष्ट्र धोरण तयार करताना त्या देशाच्या मंत्र्याशी दिवस दोन दिवस बोलणी करून त्यावर विचार होतो का? आमच्या वकिलातींनी प्रयत्न निश्चित केले असतील त्याचा काहीच फायदा कसा झाला नाही?

शिवाय इतक्या सर्व देशात जाण्याची गरज आहे का? परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग मॉस्को, वॉशिंग्टन, लंडन, ओटावा, पॅरिस आणि बॉनमध्ये काहीच प्रभाव टाकू शकत नसतील तर इतर मंत्री इतर राजधान्यात काहीच करू शकणार नाहीत. या बड्या देशांना आपल्या भूमिकेकडे वळविणे महत्त्वाचे आहे, छोट्या देशांचा आपल्याला तसा काय फायदा?

युनोचे प्रतिनिधी दोनदा येऊन गेले. ब्रिटिश खासदार येऊन गेले. त्यांचे अहवाल भारताच्या बाजूने असूनही ही बडी राष्ट्रे पाकिस्तानवर दवाव आणत नाही?

युनोच्या निर्वासित विभागाचे डेप्युटी हायकमिशन आगाखान सीमा भागात जाऊन, प्रत्यक्ष परिस्थिती पाहूनही पाकिस्तानला दोष देत नाहीत किंवा निदान निर्वासित परत जाण्याजोगी परिस्थिती निर्माण करण्यासाठी दवाव टाकायला राजी होत नाहीत. हे कशाचे चिन्ह? आमच्या परराष्ट्र धोरणाचे अपयश की भारतात येण्यापूर्वी रावळपिंडीत याह्याखानांनी आगाखानांशी केलेल्या कानगोष्टीचे यश?

## थोडे इकडेतिकडे....

बुलंदशहरी प्रजासमाजवादी पक्षाने संयुक्त समाजवादी पक्षाशी एकोपा करण्याचा निर्णय घेतला, त्याआधी थोडेच दिवस उत्तर प्रदेशामध्ये सं. स. पक्षात

एक नवा राजनारायण गट निर्माण झाला. एकोप्याचा मसुदा प्र. स. पक्षाने केला. त्याच दिवशी चंदिगडमध्ये बादल सरकार गडगडले आणि पाठोपाठ अकाली दलात आणखी फाटाफूट झाली. अनेकांनी सत्तारूढ काँग्रेसशी घरोबा केला. काही गुरनामसिगांना येऊन मिळाले. पुनः या वादात खरा अकाली दल कोणता यावर दावे प्रतिदावे सुरू झाले.

इतक्या सगळ्या घडामोडी होत असतानाच संघटना काँग्रेसची मंडळी दिल्लीत येत्या निवडणुकीसाठी तयारीला लागलं पाहिजे असे एकमेकांना सांगत होती.

काँग्रेस फुटल्यानंतर (वास्तविक पहाता त्या आधीही) पक्षाचे कार्यकर्ते जनतेत मिसळले नाहीत अशी कबुली मुंबईच्या अधिवेशनातही मिळाली होती. तिचा पुनरुच्चार झाला. आता विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या, तेव्हा जनसेवा केली पाहिजे असे ठरले. लवकरच उमेदवार निवडायला हवेत यावरही एकमत झाले.

विरेन्द्र पाटील म्हणाले, आमच्या म्हैसूर राज्यात पक्षाची परिस्थिती एकदम ओके आहे.

गुजराथमध्ये प्रदेश अध्यक्ष वजुभाई शाह आणि माजी मुख्यमंत्री हितेंद्र देसाई राज्यपातळीवर नव काँग्रेसशी हातमिळवणी करावी अशा बातम्या कानी येतात, त्याकडे दुर्लक्ष करायचे असे ठरले.

सादिक अली बैठकीनंतर बातमीदारांना भेटले तेव्हा म्हणाले, 'हितेंद्र देसाई बैठकीला आले नाहीत. त्याला फारसे महत्व नाही. बैठकीची तारीख त्यांना सोयीस्कर नव्हती, एवढंच.'

गरिबांचा कळवळा असलेला प्रागतिक विचारसरणीचा असा फक्त एकच पक्ष देशात आहे, अन् तो म्हणजे इंदिरावादी काँग्रेस, असा अचानक साक्षात्कार होऊन पक्षात प्रवेश करण्यावर निर्बंध घातले पाहिजे अशी जाणीव सत्तारूढ पक्षाच्या संसदीय गटात निर्माण झाली आहे. ती कशामुळे (आपल्या स्थानाला स्पर्धक वाढले म्हणून ?) कुणास ठाऊक ? पण असा प्रवेश देण्यापूर्वी इच्छुकाची पूर्ण छाननी झाली पाहिजे अशी मागणी मात्र होऊ लागली आहे.

गेल्या वर्षभरात पी. वेंकटसुब्बय्या, श्रीमती यशोदा रेड्डी, मोहनलाल गुप्त आणि मनुभाई शाह या प्रमुख नेत्यांसह एकट्या संघटना काँग्रेसचे तेवीस सभासद इंदिराबाईंच्या गोटात शिरले. इतर पक्षांचे वेगळेच.

गेल्या आठवड्यात या पार्लमेंटरी पक्षाची बैठक झाली, त्यात जुन्या नेत्यांनी अनेक सूचना केल्या. इच्छुकांविषयी प्रदेश काँग्रेसने खबरदारी घ्यावी, त्यांच्याविषयी अखिल भारतीय कमिटीला कळवावे, यानंतरही तात्पुरते सदस्यत्वच आधी दिले जावे असा सूर अनेकांनी काढला.

पृष्ठ ६० वर

विदेश वार्ता

सु. ल. सोमण

# लाल चीन – मार्क्सिझम्, लेनिनिझम्, माओईझम्

गेल्या वर्षापासून चीनने, अन्य राष्ट्रांबरोबरचे आपले संबंध सुधारण्याचा धडाका लावला आहे. लंडनशी थेट टेलिफोन संपर्क सुरू झाला. पिंगपाँग नीति मध्यंतरी बरीच गाजली. अगदी अलीकडे पूर्व युरोपीय राष्ट्रांशीही जवळचे संबंध प्रस्थापिण्यात चीनला यश मिळाले. विशेषत: युगोस्लाव्हिया, झेकोस्लाव्हाकिया आणि रुमानिया ह्या तीन कम्युनिस्ट राष्ट्रांशीही राजनैतिक, व्यापारी संबंध चीनने वाढवले. साहजिकच, त्यामुळे रशिया भडकला. रुमानियाचे अध्यक्ष निकोलाय कौसेक् आणि युगोस्लाव्हियाचे परराष्ट्रमंत्री मिरको तेपाव्हॅक ह्यांच्या ताज्या पेकिंग भेटीच्या वेळी म्हणूनच मॉस्कोनी चीनवर प्रखर टीकास्त्र सोडलं. तसं टीकास्त्र, अर्थात ही दोन्ही राष्ट्रे एकमेकांवर ६५ पासून सतत सोडत आहेतच. मध्यंतरी, परस्परांवर चिखलफेक करणं कमी झालं होतं. कदाचित् परस्पर-सहकार्याची कार्यक्षेत्रं निवडली जाऊन, ही दोन बलाढ्य कम्युनिस्ट राष्ट्रं पुन्हा जवळ येतील असंही भाकीत काही राजकीय वर्तुळांतून वर्तवलं गेलं होतं. परंतु ताज्या रशियन आरोपांमुळे, ह्या दोन राष्ट्रांमधली कम्युनिस्ट जगाच्या नेतृत्त्वासाठी चाललेली झुंज स्पष्ट केली आहे ! आपल्या आरोपपत्रात, मार्क्स-लेनिन ह्यांनी घालून दिलेल्या कम्युनिस्ट तत्त्वांपासून चीन ढळला आहे; १९२१ चा चिनी कम्युनिस्ट पक्ष हा सध्याच्या पक्षापासून तत्त्वतःच भिन्न होता; माओ तत्त्वज्ञान अर्धवट, अशास्त्रीय, कम्युनिस्ट-विरोधी आहे, आणि चिनी धोरणं ‘कम्युनिस्ट’

नाहीत तर संधिसाधु आहेत असे आरोप रशियानं चीनवर केले आहेत. हे आरोपही तसे नवे नाहीत. किंबहुना, चीनही नेमके हेच आरोप रशियावर करतो !

वास्तवात, चीन काय किंवा रशिया काय, कोणीही संपूर्ण मार्क्सवाद तंतोतंत पाळत नाही. ते शक्यही नाही. आपल्या सोयीपुरता भाग मार्क्सवादातून घेऊन, निव्वळ राष्ट्रवादच ही दोन्ही राष्ट्रं प्रमाण मानतात. किंबहुना, कम्युनिस्ट जगात ज्यांनी स्वतंत्र मार्ग चोखाळले त्यांनी राष्ट्रवादावरच भर दिला. जगातल्या कामगारांना तिथे दुय्यमच स्थान मिळालं. बाकीची राष्ट्रं बहुतांशी रशियाची अंकीत राष्ट्रेच बनली. पण मार्क्सवादाचं तुणतुणं वाजवणं मात्र कुणीही सोडलं नाही. हा मार्क्सवादच आज चीनपुढे प्रश्नचिन्ह होऊन बसला आहे. आत्यंतिक पुस्तकी मार्क्सवाद्यांच्या रूपाने हे प्रश्नचिन्ह आज चीनची डोकेदुखी होऊ पाहात आहे. ह्या आत्यंतिक मार्क्सवाद्यांना, संपूर्ण मार्क्सवाद तावडतोब आणला जायला हवा आहे. सामुहिक शेतांची मालकी राष्ट्राकडे यायला हवी आहे. शेतकरी-संघाकडे राहायला नको आहे. शेतकऱ्यांचे फावल्या वेळातले, त्यांना उत्पन्न मिळवून देणारे व्यवसाय बंद व्हायला हवे आहेत. सहकारी शेतं ('कॉम्युन्स'), जमिनी किंबहुना दृष्टिसमोर येईल त्या प्रत्येक गोष्टीचं राष्ट्रीयीकरण ह्या पोथीनिष्ठांना हवं आहे. काही प्रांतातनं (उदा. क्वांगसी, शांटुंग वगैरे) तर, पेकिंगच्या फतव्यांविरुद्ध जाऊनही 'कॉम्युन्स'चं राष्ट्रीयीकरण करण्याचे प्रयत्न हे पोथीनिष्ठ करीत आहेत. पेकिंग रेडिओचा ह्या आत्यंतिकांवर आज भडिमार चालला आहे. त्यांना ह्या अवस्थेपर्यंत पोचविण्याची जबाबदारी माओ त्से तुंगचे प्रतिस्पर्धी लीऊ शाओ ची ह्यांच्यावर टाकली जात आहे. त्यांच्यावर ताशेरे झाडले आहेत. १९५८ मधल्या घडामोडींची जबाबदारीही त्यांच्यावर टाकली जात आहे. त्यांच्या, आत्यंतिकवाद्यांच्या निषेधातून चीनमधले रेडिओ, तिथली वृत्तपत्रं ह्या लाटेला थोपवून धरायचा प्रयत्न करीत आहेत.

## त्यांना हवी आहे नवी लाट...

वास्तविक, सांस्कृतिक क्रांतीनंतर, मार्क्सवादाचे धडे गिरवण्याचं प्रोत्साहन शासनानंच तिथे तरुणांना दिले. परंतु त्याची फळं आज उलटी येताना दिसताहेत. मुळात कम्युनिस्ट क्रांति चीनमध्ये शेतकऱ्यांच्या उठावातनं झाली, 'कॉम्युन्स'च्या आधारे झाली, कामगार चळवळीतनं नाही. आणि नंतरही, औद्योगिककरणाची गती वाढत असतानासुद्धा 'कॉम्युन्स'चं चिनी राज-अर्थकारणातलं महत्त्व अनन्यसाधारणच राहीलं. ह्या 'कॉम्यून्स'ना धक्का लावून, अर्थयंत्रणा विस्कळीत करणं म्हणूनच चेअरमन माओ त्से तुंगना योग्य वाटत नाही. मार्क्सवादाच्या आड त्यांचा व्यवहारी माओवाद येतो तो इथे. नि तिथेच कडव्या, पुस्तकी मार्क्सवाद्यांना थांबायचं नाही. त्यांना पुन्हा एकदा १९५८ प्रमाणे सांस्कृतिक-आर्थिक चळवळीची लाट हवी आहे; 'ग्रेटलीप फॉरवर्ड' हवी आहे ! पण १९५८ नंतरचे दिवस चीन विसरू शकणं शक्य नाही. हुनान, शेन्सी, शांघाई इत्यादि ठिकाणचे उठावही तो

विसरू शकणार नाही. म्हणूनच, शेतकऱ्यांचा, सामान्य जनांचा रोष ओढवून घेऊन मार्क्सवाद्यांना रान मोकळं सोडण्याचं धाडस माओ करू शकणार नाहीत !

## इंग्लंड : सामायिक बाजारपेठेत प्रवेश ?

इंग्लंडला युरोपियन सामायिक बाजारपेठेत प्रवेश यंदा मिळेल का ? राजकीय निरीक्षकांच्या मते यंदा ही शक्यता बरीच वाढली आहे. त्यांच्या मते युरोपियन सामायिक बाजारपेठेत प्रत्यक्ष प्रवेश ब्रिटनला मिळणं ही एक केवळ आता औपचारिक बाब उरली आहे. गेली दहा वर्षे ब्रिटन, युरोपियन सामायिक बाजारपेठेची दारं ठोठावीत आहे आणि प्रत्येक वेळी इंग्लंडला दारुण अपयश येत गेलं आहे. ह्या ब्रिटिश–अपयशाचा मान सर्वस्वी फ्रान्सला मिळत गेला आहे. फ्रान्सचे भूतपूर्व अध्यक्ष द गॉल ह्यांचा ब्रिटन–प्रवेशाला कडवा विरोध होता. त्यांच्या मते इंग्लंड हे सर्वार्थानं ' युरोपी ' राष्ट्र म्हटलं जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे इंग्लंडचे आणि अमेरिकेचे घनिष्ठ संबंध आहेत. किंबहुना इंग्लंडला सामायिक बाजारपेठेत प्रवेश देणं म्हणजे अमेरिकन प्रतिनिधित्वाला युरोपीय उलाढालीत अवसर देण्यासारखंच होय. आणि एकंदर अमेरिकन वर्चस्वालाच द गॉल ह्यांना शह द्यायचा होता. एकसंघ, समर्थ युरोप, सामायिक बाजारपेठ, सामायिक अर्थव्यवस्था ह्यांच्याद्वारे अमेरिकेला प्रतिस्पर्धी वर्चस्व प्रस्थापित करायचं हा त्यांचा मानस होता. त्यांचे प्रत्येक पाऊल त्या दृष्टीनं पडलं आणि फ्रेंच जनतेने त्यांना साद दिली. साहजिकच ब्रिटनच्य प्रवेशाला त्यांनी कडवा विरोध केला. त्यांच्या पश्चात्, दडपणाखाली असेल वा कसंही पण अध्यक्ष पाँपिदु व त्यांच्या गॉलिस्ट शासनानं, द गॉल ह्यांची भूमिका सोडली नाही. गेल्या तीन खेपांना ब्रिटन प्रवेशाला खो मिळाला तो केवळ फ्रान्सच्या ह्या ताठर भूमिकेमुळेच !

यंदा मात्र परिस्थिती बरीच बदलली आहे. अध्यक्ष पाँपिदु आणि ब्रिटिश पंतप्रधान एडवर्ड हीथ ह्यांच्या ताज्या भेटीतून जे चित्र पुढे आलं आहे ते ब्रिटनच्या प्रवेशाच्या दृष्टीनं खूपच समाधानकारक आहे. ह्या भेटीनंतर दोन्ही नेत्यांनी ब्रिटन आणि फ्रान्समधील संबंध सुधारण्याचा, मैत्रीचं पुनरुज्जीवन करण्याचा, आर्थिक–सामाजिक–राजकीय संबंध दृढावण्याचा संकल्प सोडला आहे. फ्रान्सच्या अनपेक्षित वृत्ती–बदलांमुळेच, ब्रिटनच्या बाजारपेठ प्रवेशातला मोठा अडसर आता दूर झाला आहे असं समजायला हरकत नाही. आणि तशाच शब्दांत आपली प्रतिक्रिया हीथसाहेबांनी पत्रकारांजवळ व्यक्त केली.

हा मुख्य अडसर दूर झाला असला तरी, खुद्द ब्रिटनमध्ये ६५% जनता ब्रिटनच्या ह्या निर्णयाला विरोध करीत आहे नि त्यांचा विरोध दूर करणं हे आता हीथ सरकारपुढचं दुसरं मोठं संकट आहे. प्रमुख विरोधी पक्ष–मजूर पक्ष–देखील

विरोधात आहे. विरोध विविध कारणांनी आहे. पहिलं कारण म्हणजे दहा वर्षं नकार मिळाल्याबद्दलची चीड हे आहे. ब्रिटनच्या प्रवेशामुळे ताबडतोबीचा परिणाम म्हणजे भाव-वाढ होणार आहे हे दुसरं कारण आहे. राजकीय दृष्ट्या डावे गट विरोध करीत आहेत हे तिसरं कारण आहे. काहीसा भावनिक, काहीसा आर्थिक, काहीसा राजकीय असा हा त्रिविध विरोध दूर करण्यासाठी हुजूर पक्षानं आणि शासनानं आता जनमत तयार करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम हाती घेतला आहे. ब्रिटन प्रवेशाचे दूरगामी आर्थिक व राजकीय फायदे जनतेला समजावून सांगण्यसाठी प्रचारयंत्रणा बांधल्या जात आहेत. अर्थज्ञ ह्या प्रचारांना आकडेवारी देऊन पुष्टी देत आहेत. त्यामुळेच ह्या विरोधावर मात करता येईल असं पंतप्रधानांना वाटतं. तसा आत्मविश्वास ते व्यक्त करतात !

## फ्रान्सचा डाव

फ्रान्सच्या भूमिकेतला बदल अनपेक्षित वाटला तरी अनाकलनीय निश्चित नाही. अ. पॉंपिदु ह्यांनी सुरुवातीला विरोध केला हे जरी खरं असलं तरी ते, द गॉल ह्यांच्याइतके कडवे अमेरिका-विरोधक नाहीत हेहि तितकंच खरं. सुरुवातीचा त्यांचा विरोध कदाचित् जनमताच्या दडपणापायी असावा; निदान त्या भीतीपायी असावा ! दुसरं कारण म्हणजे प. जर्मनी असावं. युरोपमध्ये आर्थिक दृष्ट्या आज जर्मन मार्क वर्चस्व गाजवून आहे. जर्मनीचा दबदबा वाढतो आहे. अशावेळी जर्मनीनं डॉलर वाचविण्यासाठी धडपडावं, मार्क मुक्त करावा हे फ्रान्सला मानवलं नाही. रुचलं नाही. डॉलरवर ताण पडून, त्या दबावाखाली अमेरिकेनंच डॉलरचं अधोमूल्यन करून डॉलर-प्रश्न सोडवावा असं फ्रान्सचं मत होतं. जर्मनीनं त्या उलट मार्क मुक्त करून डॉलर वाचवायसाठी धडपड केली. साहजिकच जर्मनीला काटशह देण्यासाठी इंग्लंडला सामायिक बाजारपेठेत प्रवेश द्यावा; मार्कला स्टर्लिंगची टक्कर मिळावी असा डाव फ्रान्सने टाकला असावा.

ते काही असलं तरी, दहा वर्षांपासून बंद असलेले युरोपीय सामायिक बाजारपेठेचे दरवाजे ब्रिटनला खुले होण्याची शक्यता निर्माण झाली आहे आणि त्याचा फटका, भारतासह सर्व कॉमनवेल्थ राष्ट्रांना बसणार आहे एवढं मात्र निश्चित !

□ □ □

रवींद्र पिंगे

# शब्दपावली

## दीनानाथ गोपाळ तेंडुलकर

# डी. जी.

## एक अवलिया

एका प्राथमिक शिक्षकाच्या पोटी त्याचा जन्म झाला. ही गोष्ट तो केव्हाही विसरला नाही. आपल्याला टक्कर देत देतच ही औटकी जिंदगी सार्थकी लावायची आहे, ह्याची त्याने सुरुवातीलाच मारलेली खूणगाठ, कधीही चित्ताआड होऊ दिली नाही. वणवण त्याच्या भाळी नियतीनेच लिहिलेली होती. मात्र त्यासाठी तो अदृष्टावर कधीही डाफरला नाही. आला दिवस त्याने सुखाचा केला. कुणावरही भार टाकला नाही. लेखणी त्याला वश होती. तेच त्याने धन मानलं. कुलवान पुरुष गृहलक्ष्मीला ज्या खानदानी सन्मानाने वागवतो, त्याच उदात्त भावनेने त्याने आपल्या लेखणीला हयातभर वागवलं. लेखणीच्या चारित्र्याचा प्रश्न आला तेव्हा त्याने तडजोड पत्करली नाही. अर्धी दुनिया त्याने पालथी घातली. माळरान तुडवलं. फत्तर फोडला. पण लेखणी कधी बाटवली नाही. शीलसंपन्न गृहिणीबरोबर संसार करण्यातलं सुख त्याने आपल्या लेखणीचं पातं

नाहीच नाही. पण तो पस्तावला आहे असं कधी झालं नाही. तो सदा संतोषीच राहिला. आला दिवस त्याने ताठ मानेने काढला. भविष्याबद्दल तो म्हणायचा, 'खुदा हफीझ!' त्याला काय कमी होतं? पंडितजींच्या जेवणाच्या मेजावरची सफरचंदाची फोड उचलण्याइतका तो त्यांच्या मोहब्बतीचा विषय झाला होता. त्याच्या लेखनाची प्रुफे तपासून द्यायला गांधीजी आनंदाने तयार झाले. स्टॅलीनने-सुद्धा त्याच्या कामाचे शिफारसपत्र लिहून दिले. अधिकृत गांधीचरित्रकार म्हणून त्याची कीर्ती सातासागरापल्याड पोहोचली. दुसरा-तिसरा असता तर डोक्यावरच चालता. डी. जी. दोन पायांवर तुमच्या आमच्यासारखा चालत राहिला.

त्याने फार संकोच केला. खुद्द गोऱ्या साहेबानेही सलाम करावा अशा फर्ड्या इंग्रजीमध्ये पाच सहस्र पृष्ठांचा दर्जेदार मजकूर लिहिणाऱ्या त्या बहाद्दराने स्वतःबद्दल चरित्रपर अशा चार ओळीही लिहिल्या नाहीत. हे व्रत चालू शारदो-पासकांच्या आजच्या प्रथेला छेद देणारं आहे. साहित्य अकादमीने विचारलं तेव्हा त्याने आत्मचरित्रपर अशी दोन बोटांची चिठ्ठी लिहिली. 'नाव – दीनानाथ गोपाळ तेंडुलकर. जन्मतिथी ९–१०–१९०९. जन्मस्थळ रत्नागिरी. शिक्षण बी. ए. (ऑनर्स). व्यवसाय लेखन. वास्तविक पहाता बोरूबहाद्दर आपले फोटो कसे मार डाला पोझमध्ये काढून घेतात, छापून आणतात! डी. जी. त्या गावचाच नव्हता. तो पट्टीचा छायाचित्रकार होता. त्याच्या अतुलनीय नैपुण्याची साक्ष देणारी हजारो छायाचित्रं देशोविदेशी प्रसिद्ध झाली. पण त्याने कधी स्वतःची छबी उतरून घेतली नाही. असल्या मामुली गोष्टीत त्याला रस नव्हता. सवंग प्रसिद्धीचं त्याला वावडं होतं. एकदा कथामालेचे कार्यकर्ते त्याला आपल्या समारंभाचे अध्यक्ष म्हणून कटवायला बाणगंगेवरल्या त्याच्या बंगल्यावर गेले. गृहस्थ तिथे रामप्रहरी बागकाम करीत होता. त्याने फक्त एक मळकी अर्धी तुमान घातली होती. बाकी उघडाच होता. हातपाय मातीत रंगले होते. कार्यकर्त्यांना वाटलं हा एक भाडोत्री माळी असावा. त्यांनी हटकल्याच्या स्वरात विचारलं,

'अरे, तेंडुलकर कुठे आहेत?'

'मीच तेंडुलकर.' तो माळी पाण्यासारख्या थंड आवाजात म्हणाला. चपापलेले कार्यकर्ते म्हणाले,

'तुम्हालाच भेटायला आलो आहोत.'

'तुम्ही ह्या बंगल्यात चला. पाच मिनिटं तिथे जे काही आहे त्यात रमा. मी येतोच.'

कार्यकर्ते एका दालनात गेले. तिथली पुस्तकं, चित्रं, शिल्पांचे तुकडे, मांजरं, फिल्मस, पिसं, पिशव्या, कातडी, ध्वनिमुद्रीका, टेपा, हस्तलिखितं, फुलं, पेनं, वगैरे

संसार पहातच राहिले. हातपाय धुवून तो कार्यकर्त्यांच्या समाचाराला हजर झाला टपून बसलेल्या कार्यकर्त्यांनी तोंडून ब्र काढायच्या अगोदरच तो म्हणाला,

'तुम्ही काही सांगण्याच्या अगोदर मी काय सांगतो ते नीट ऐका.'

हाराच्या आशेने लाळ घोटणाऱ्यांच्या पंक्तीतला हा भिडू नव्हे ह्याची पुसट कल्पना आलेले कार्यकर्ते सावरून बसले. तो सांगू लागला,

'मला चार गोष्टी बिलकूल आवडत नाहीत. एक : चारचौघात मिसळणं मला आवडत नाही. दोन : मी कधी स्टेजवर चढत नाही; स्टेजवरून बोलत नाही. तीन : माझ्या कार्यक्रमाचा वृत्तांत वर्तमानपत्रात आलेला मला अजिबात सहन होत नाही. आणि चार : माझं नाव वृत्तपत्रात आलेलं मला चालत नाही. आता तुमच्या लक्षात येईल की मी हा असा माणूस असल्यामुळे मी तुमच्या उपयोगाचा नाही! शिवाय, मी काय करतो ते तुम्हाला ह्या दालनात दिसलंच आहे. त्यात कुणी कसल्या सूचना केलेल्या मला चालत नाहीत. त्याच न्यायाने तुम्ही जे काही करत असाल त्याबाबत मीही सूचना करणार नाही. मी माझ्या मार्गानेच जाईन. तुम्ही तुमच्या मार्गाने जा. मी तुमच्या कामाच्या दृष्टीने अगदी निरुपयोगी आहे.'

एव्हापर्यंत चक्रावून गेलेले कार्यकर्ते औचित्याला जागून म्हणाले,

'आम्ही आमच्या प्रमुखांजवळ हे सगळं सांगतो नि ते काय म्हणतात ते तुम्हांला फोनवर कळवतो.'

तेंडुलकर शांतपणे उद्‌गारले,

'माझ्या घराचं नाव वाचलंत? नाही! ह्या बंगलीचं नाव आहे 'एकांत. मग अशा एकांताचा भंग करणारी टेलिफोनची घंटा मला कशी बरं चालेल? मला टेलीफोन दिला होता. मी तो साभार परत केला.'

कार्यकर्त्यांचा मोरू झाला.

मात्र ह्यावरून तो माणूसघाणा होता असा निष्कर्ष काढणं चूक ठरेल. माणसांचा तो फार लोभी होता. आमचे जुने केंद्राधिकारी श्री. मूर्ती एकदा दिल्लीला जायला निघाले, तर त्याने त्यांच्यासोबत पिशवीत एक पोपया अगत्यपूर्वक बांधून दिला व म्हणाला, 'हा इंदिरेला द्या. म्हणावं डी. जी. ने बागेतला काढून पाठवला आहे.' हे व्यक्तिगत लोभाचं उदाहरण जरी बाजूला ठेवलं तरी ऐन उमेदीत त्याने उत्तरप्रदेशातल्या शेतकऱ्यांमध्ये पं. नेहरूंच्या सांगीवरून संघटनात्मक कार्य केलेले होते. त्याप्रीत्यर्थ देहदंडाच्या शिक्षाही भोगल्या होत्या. माणसांवरल्या प्रेमाशिवाय हे घडणं शक्य आहे?

खरंच, ह्याने कारावास भोगण्याची काय गरज होती? बुद्धीने तो तल्लख होता. एलफिन्स्टन महाविद्यालयात त्याने गणितात पहिल्या प्रतीचे प्राविण्य दाखवले. गणिताची उच्च परिक्षा देण्यासाठी तो टोपीवाले देसायांची शिष्यवृत्ती घेऊन विसाव्या वर्षी विलायतेला केंब्रिज विद्यापीठात दाखल झाला. केंब्रिजला त्याने

खगोलविज्ञानाचा अभ्यास सुरू केला होता. पण १९३० साली गांधीजींनी दांडी यात्रा काढल्याबरोबर त्याचे विद्याभ्यासावरचे लक्ष उडाले. स्वातंत्र्याच्या चळवळीत तो अगोदरच गुरफलेला होता. पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांचा जय व्हावा म्हणून शाळकरी विद्यार्थ्यांची सामुदायिक प्रार्थना शाळांमधून त्याकाळी घेतली होती. त्याने त्या प्रार्थनेला उभं रहायचं नाकारून खुद्द स्वतःच्या वडिलांकडून छडीचा प्रसाद खाल्ला होता. दलितांचा वाली म्हणून तो लेनीनकडे पाहू लागला. अठ्ठावीस सालच्या कलकत्ता काँग्रेसला तो हजर राहिला होता. युसुफ मेहेरअल्लीचा तो स्नेही होता. त्याचे संस्कार ताजे होते. त्याचा परिणाम झाला. तो केंब्रिजचा अभ्यास अर्धवट सोडून मुंबईला परत आला. पण परत आला नि गांधीजींची चळवळ थंडावली. तो सर्द झाला. सुदैवाने त्याची नि पंडितजींची गाठ पडली आणि पंडितजींच्या सूचनेवरून तो उत्तरप्रदेशात किसानांच्यात संघटनात्मक काम करू लागला. जोडीला लेखन आणि छायाचित्रण हे दोन्ही परस्परपूरक छंदविषय त्याने पद्धतशीरपणे जोपासले. त्याने टिपलेली ग्रामीण जीवनाची क्षणचित्रे काका खाडिलकरांनी 'नवाकाळ'मध्य छापली. त्याला चार पैसे दिले. त्याची परिस्थिती फार ओढगस्त झाली. बाप प्राथमिक शिक्षक. म्हणजे तिकडून चार पैसे मिळण्याची आशाच नाही. विलायतच्या शिक्षणाचा हा असा खेळखंडोबा झालेला. ऊसकामगारांच्या चळवळीत पायाला चाकं लागलेली. परोठा-दीड परोठा खाऊन तो अनवाणी हिंडू लागला. कम्युनिझमची पुस्तकं वाचू लागला. पुढे स्पेनच्या यादवीत धारातीर्थी पडलेल्या डाव्या गटाचा कार्यकर्ता आणि गणितज्ञ डेव्हीड गेस्ट ह्याने केंब्रिजमध्ये त्याला 'पोटेम्किन' हा सोविएत चित्रपट दाखवला होता. तो पाहून हा भारावून नव्हे, तर चांगला आरपार पालवून गेला होता. त्या क्षणापासून ही नवी सोविएत सृष्टी स्वतः पाहाण्याचा व अनुभवण्याचा त्याचा निश्चय दृढ झाला होता. नेहरूंच्या नि त्याच्या प्रेमाचा पूल ह्या मोक्याच्या क्षणी बांधला गेला. नेहरूंच्या शब्दाखातर तो वतमानपत्री किरकोळ लेखन करू लागला. दोन पैसे मिळू लागले.

पुन्हा विलायतेला जाण्याचा त्याने चंग बांधला. तेव्हा हजार अडचणी उभ्या राहिल्या. जिथून आपण अर्ध्यावरून परतलो त्या इंग्लंडमध्ये पाऊल टाकायचे नाही हे त्याने पक्कं केलं. टोपीवाले देसाई अर्ध्यावरून पळ काढणाऱ्या अशा भन्नाट विद्यार्थ्याला पुनरपि शिष्यवृत्ती मंजूर करायला कबूल होईनात. महाशयांनी ह्या वेळी खगोल शास्त्र बाजूस ठेवून विमान उड्डाण आणि तत्संबंधीत गणिती प्रमेये डोक्यांत भरून घेतली होती. त्या अभिनव शिक्षणाची सोय जर्मनीत होती. पैशाभावी जर्मनीत पोहोचायचं कसं? प्रा. न. र. फाटकांनी मध्यस्ती केली आणि टोपीवाले देसाई यांनी परदेशी शिक्षणाच्या शिष्यवृत्तीची निम्मी रक्कम मंजूर केली. फाटकांबद्दलची कृतज्ञता आणि शिष्यवृत्तीची रोख रक्कम घेऊन तो जर्मनीतल्या गोटिंजन विद्यापीठात दाखल झाला. जर्मनीत पाऊल टाकल्याबरोबर नाझी राज्यकर्त्यांना

त्याचा वास आला आणि कम्युनिस्टांच्या सहप्रवासी असल्याच्या आरोपावरून त्याला एका महिन्याच्या कारावासाची शिक्षा झाली. हिटलरी तुरुंगाची हवा त्याने आल्या आल्याच महिनाभर खाल्ली आणि जर्मनीतून गाशा गुंडाळून तो पॅरिसला निर्वासित म्हणून हजर झाला.

आता गणितविद्येचा नाद त्याने पूर्णपणे सोडला होता. सोविएत सृष्टीच्या अभिनव घडणीत आता त्याचे चित्त गुंतले होते. आपण रशियाला जाऊन तेथे चित्रपट निर्मितीची छायाचित्रण वगैरे अंगे शिकावीत असे त्याला वाटू लागले. पण स्टॅलीनच्या रशियात पाऊल कसे टाकायचे ? म्हणून त्याने फ्रान्समध्ये रोमा रोलांशी संधान बाधले व त्यांची चिठ्ठी घेऊन इन्टुरिस्ट संस्थेतर्फे तो १९३४ च्या सप्टेंबर महिन्यात रशियात दाखल झाला. सतत तीस महिने तो रशियात चित्रपटांचे छायाचित्रण शिकत होता. त्याने आपल्या रशियातील कालखंडाबद्दल लिहिले आहे, 'सूर्योदयापासून रात्रौ आठ वाजेपर्यंत पायाना बिलकूल विश्रांती न देता मॉस्कोतील अनेक संस्कृतिविषयक संस्थांकडे मदतीसाठी मी फिरत राहिलो. अनेकदा मला उपाशी पोटीसुद्धा हिंडण्याची पाळी आली. माझी प्रवासातील सोबतीण मारी सीटन हिने सोव्हियट चित्रपटाचे जगद्विख्यात कर्ते म्हणजे पुडॉव्हकीन, आयसनस्टाईन व डोवझेंको ह्यांच्याशी माझी ओळख करून दिली. मॉस्कोमध्ये मी आयसनस्टाईनची चित्रपटावरची व्याख्याने ऐकली व तसेच दुसऱ्या अनेक चित्रपटनिपुण लोकांबरोबर चित्रपटाचे काम केले. इझवेस्तिया, प्राव्हडा, कस्त्योर वगैरे सोव्हियट वर्तमानपत्र व मासिके ह्यात माझे फोटोग्राफ व लेख प्रसिद्ध झाले. मधूनमधून मी वस्तुसंग्रहात काम करीत असे व संस्कृतीच्या विषयावर लेख लिहीत असे. चित्रपटांच्या कामामुळे सोव्हियट लेखकांच्या व कलानिपुणांच्या बऱ्याच ओळखी मला घडल्या. मॉस्को व लेनिनग्राडमध्ये माझ्यावर ममतेचा वर्षाव होत असे. माझे वर्तन सर्वांशी ममतेचे पण उघडे होते. त्यामुळे मला बरेच मित्र मिळाले. मी रशियन कुटुंबातच रहात असे म्हणून मला सोव्हियट जीवनाची चांगली ओळख झाली. राजकारणात माझे फारसे लक्ष नव्हते. माझ्या शिक्षणाचे क्षेत्र सोव्हियट संस्कृती होते. सप्टेंबर १९३४ साली माझ्या वयाच्या २६ व्या वर्षी अनेक दिवस मनात घोळत असलेला हा रशियाचा प्रवास एकदाचा घडला व तेथे मार्च १९३७ पर्यंत म्हणजे एकंदर अडीच वर्षे मी राहिलो. लेखन व फोटोग्राफी यांच्या सहाय्याने मी रशियांत स्वतःची उपजीविका चालवीत होतो.'

वडील आजारी पडले म्हणून तो ह्या नवीन विद्या आत्मसात करून भारतात परतला. रशियात त्याने संसारसुख भोगले होते. पण पुनरपि तो त्या वाटेला गेला नाही. रशियन संस्कृतीबद्दल मात्र त्याच्या हृदयात अटोकाट प्रेमभावना होती. तो कम्युनिस्ट झाला होता, पण इथल्या गावठी कम्युनिस्टांनी त्याला पक्षकार्यात पुढे सरकू दिले नाही. रशियाहून परतताना त्याने फार मोठ्या प्रमाणावर पोस्टर्सचे

बोजे आणले होते. त्यांचे एक प्रदर्शन त्याने मुंबईच्या कांग्रेस हाऊसमध्ये लावले होते व त्याचे उद्‌घाटन पं. नेहरूंच्याच हस्ते झाले.

पंडितजींबरोबर पडलेली ही गाठ पुढे एक तप अधिकाधिक घट्टच होत गेली. उत्तर प्रदेशातल्या किसानांचे संघटना कार्य करण्यासाठी तब्बल बारा वर्षे तो ऊस-मळ्यातून तोकड्या तुमानी घालून पावसापाण्यातून वणवण हिंडला. महत्त्व ह्याचे नाही. अपूर्वाई ह्याची आहे की पंडितजींच्या शब्दाखातर आपल्या अमोल हयातीतलं एक तप ध्येयवादाने कापूरासारखं जाळून टाकल्यानंतर त्याची परतफेड म्हणून त्याने काहीही वांछिलं नाही. त्याला काय अशक्य होतं ? गांधीजींनी पुरस्कारलेला तो त्यांचा अधिकृत चरित्रकार होता. म्हणजे जवळजवळ दादामाणूसच. पण तो लांडी तुमान घालून सर्वत्र संचार करणारा साधा डी. जी. च राहिला. किसान कार्यकर्ता म्हणून त्याची फार फरफट झाली. वीस महिने त्याने जेलमधल्या भाकऱ्या खाल्ल्या. लखनौ, कलकत्त्याकडच्या नियतकालिकांमधून त्याने वृत्तपत्रीय लेख लिहून पाहिले. पण अपेक्षित द्रव्य त्यातून सुटले नाही. म्हणून त्याने स्वतः होऊन गांधीजींकडे त्यांच्या समग्र चरित्राची गोष्ट काढली. अष्टखंडात्मक प्रदीर्घ आणि सचित्र चरित्र लिहिण्याचे त्याचे स्वप्न होते. पंडितजी साक्षीला होते. गांधीजींनी आनंदाने होकार भरला. डी. जी. ने भारतभर भ्रमण केलं. प्रत्येक लहानसहान गोष्टीचा पडताळा घेतला आणि सतत बारा वर्षे राबून जगाच्या इतिहासातला प्रचंड चरित्र-प्रकल्प तडीला नेला. गांधीजींची तबियत खुष झाली. त्यांनी पहिले सात खंड स्वतः तपासले. मग प्रकाशकासाठी धावाधाव सुरू झाली. डी. जी. ने जर्मनीतलं, रशियातलं अद्यावत मुद्रण पाहिलेलं होतं. आपला ग्रंथ तसाच स्वच्छ सौंदर्यदृष्टीने मुद्रित व्हावा असा त्याचा हेका होता. गांधीवादी बंगाली कार्यकर्ता कुमारी अनु वंदोपाध्याय त्याच्या सहाय्याला आल्या. 'टाईम्स'मध्ये मुद्रण करण्याचं नक्की झालं. संगमरवरासारख्या दिसणाऱ्या कागदावर छपाई करण्याचं ठरलं. पंडितजींनी पहिली देणगी पाच सहस्र रुपयांची दिली. महिन्याभरात अर्ध्या लाखाचा गल्ला भरला. ग्रंथराज दृष्ट लागेल अशा ऐटीत प्रसिद्ध झाला. डी. जी. चं नाव वाऱ्यावर दशदिशात घुमलं. स्तुतिसुमनांचा त्याच्यावर वर्षाव झाला.

डी. जी. मात्र होता तसाच राहिला. अर्धी तुमान घालून तो जुन्या पुस्तकांचे बाजार धुंडाळत राहिला. काही दुर्मिळ ग्रंथरत्न आढळलं तर पडेल ती रक्कम मोजून तो झोळीत घालायचा. अर्ध्या बाह्यांचा खादीचा सदरा, अर्धी तुमान, पायात कोकणी वहाणा आणि खांद्यावर एक कार्पेटच्या कापडाची रंगीत, खरखरीत झोळी ह्या वेषात गव्हर्नरपासून गवंड्यापर्यंत सर्वांकडे त्याची पैरवी असे. सर्वांची घरे त्याला सदैव उघडी असत. सदानंद भटकळांचं घर त्याने आपलच मानलं होतं. सौ. निर्मला भटकळ म्हणजे जणू त्याच्या सःखस्त वहिनीच होत्या. तो लहर लागेल तेव्हा त्यांच्या स्वयंपाक घरात येऊन भाजीभाकरीचा सन्मान करून जाई. फाटकांचं घरही तसंच

त्याने आपलंच मानलं होतं. बेंचाळीस साली वडील वारल्यावर त्यांना भडाग्नि देऊन स्मशानातून तो तडक फाटकांच्या दारात आला आणि भडभडून म्हणाला, 'मी निराधार झालो!' मग तिथेच राहिला. पुढे त्याचं स्वतःचं घर झालं तरी आठ-पंधरा दिवसांनी तो फाटकांच्या घरात उगवायचा. पापड, लोणचं, भाकरी, मागायचा. ताव मारून तृप्त व्हायचा. निजायला बाणगंगेवरल्या बंगलीत परतायचा.

दत्तात्रेयाचा वर असल्यासारखं भ्रमंतीत रमणाऱ्या डी. जी. चं घर म्हणजे एक प्रकरणच होतं. त्याचे वडील गोपाळराव हे पेशाने प्राथमिक शिक्षक असले तरी फावल्या वेळात ते बॅ. वेलींगकरांच्या काळबादेवीच्या चाळींचं मेथाजीपणही करीत. म्हणून काळबादेवीलाच त्याच चाळीत त्यांना वेलींगकरांनी एक खोली दिली होती. डी. जी. तिथेच पुस्तकांचा डोंगर जमवीत रहात होते. डॉम मोराएसने आपल्या आत्मचरित्रात डी. जी. च्या त्या मठीला वारंवार भेट दिल्याचं मोठं सहृदय वर्णन केलेलं आहे. जुन्या चाळीच्या चौथ्या मजल्यावर हा गृहस्थ गरिबीचं एकाकी जीवन जगायचा. हॉटेलात पावमिसळ, भजी खायचा. चारपाई खाटेवर पडायचा. छंद म्हणून हस्तीदंती वस्तू जमवायचा. पुस्तकांच्या थप्पी संभाळायचा. लेख लिहून पोट भरायचा. त्यांच्या पंक्तीत मांडीला मांडी हक्काने लावून बसणाऱ्या डी. जी. ची ही ओढगस्त पाहून पंडितजी व्याकुळले. त्यांनी बाणगंगेजवळ समुद्रकिनाऱ्यावरली सरकारी जागा पाहिली. त्यातला एक छोटासा कोपरा डी. जी. ला बहाल केला. मानधनाची एक घसघशीत रक्कम हाती पडल्यावर डी. जी. ने त्या तुकड्यावर एक बंगली उभारली. सभोवार चार फुलझाडं लावली. फळझाडं लावली. घरात मांजरे आणली. कुत्रे आणले. मित्र आणले. अन् डी. जी. च्या मित्रांना बंगाली पद्धतीची भातरोटी आग्रहाने खायाला घालू लागली. डी. जी. चं घर बाणगंगेवरल्या एकांतात नांदू लागलं.

डी. जी. जसा चारी दिशा मोकाट हिंडायचा, तसा इतरांनाही आपल्या घरी आग्रहाने बोलवायचा. पाश्चिमात्य संगीताच्या टेपांचे अजोड धन त्याने गाठीस लावले होते. ते स्वर्गीय संगीत तो मित्रांना पुन्हा पुन्हा भाष्य करीत ऐकवायचा. जेऊ खाऊ घालायचा. एखादी ध्वनिमुद्रिका त्याच्याकडे नसली तर आम्हाला आकाशवाणीवर चिठ्ठी पाठवायचा की महाराज, बिथोवनची फलाणी फलाणी सिंफनी एकदा ऐकवा बुवा! मग गुदाम धुंडाळून आम्ही ती सिंफनी खास डी. जी. साठी ध्वनिक्षेपित करायचे. असा त्याचा लळा होता नि अशी त्याची पत होती. हे पुण्य त्याने कशाच्या बळावर जोडले? प्रसंगी त्याच्यापाशी चार चव्वल नसत. पण तो माणसांशी माणसासारखा सरळ रेषेत वागायचा. ढगांसारखा सरळ रेषेत वहायचा सामान्य माणसासारखा रहायचा. शहाणपणाच्या गोष्टी बोलायचा. मार्मिक लिहायचा. बंगल्यात गेला तरी तिथेही त्याची कापडाच्या सर्व पट्ट्याची चारपाई आलीच. त्याच्या कुणा मित्राने त्याला अस्वलाचं कातडं दिलं होतं. ते अंथरून

त्याच्यावर चटई टाकून झोपायचा! चारपाईच्या खाली त्याचा कुत्रा झोपायचा! त्याने पक्षांशीही दोस्ती केली होती. त्याच्या क्रीडा तो टक लावून न्हाहाळायचा. पावसातून अनवाणी चालायचा. बागेतल्या फुलझाडांना गोंजारायचा. ह्या भूमीत त्याच्या डोक्यावर अक्षता पडल्या नाहीत. पण अनुने त्याच्या जीवनांत कडवटपणा येऊ दिला नाही. पंडितजींनीही त्याच्यावर अलोट लोभ केला. त्याच्या मठीतला चहा घेतला. त्याला धन्य वाटलं.

अलीकडच्या चार पाच वर्षांपर्यंत त्याचे ग्रंथकाराच जीवन असं प्रवाही चाललेलं होतं. पण बाणगंगेच्या रस्त्यावर त्याला एकाएकी मोटारीचा धक्का लागला आणि तेव्हापासून त्याच्या चित्ताची कळी हळूहळू कोमेजू लागली. त्याचा आनंद दोन बोटे आटला. तरीही तो पुस्तकं जमवीतच राहिला. मित्रांकडे जाऊन भातभाकरीची मायाळू मागणी मोकळेपणाने करीतच राहिला. शिल्पांचे फुटके तुकडे जमविण्याचा नवाच छंद त्याने जडवून घेतला. त्यानिमित्ताने तो पार पूर्वेकडच्या दऱ्याखोऱ्यातून फिरून आला. साठी ओलांडल्यावर त्याच्या चर्येत किंचित फरक पडला. शरीर फार स्थूल झालं. धूम्रपान तर पूर्वीपासूनच अखंडीतच असायचं. पण आता व्यायामाचा पूर्ण अभाव असल्यामुळे तो डेपाळल्यासारखा वाटू लागला. पण उत्साहात रेसभरही मागे नव्हता. परवा मेघालय, त्रिपुरा वगैरे डोंगराळ भागात फेरफटका करून आला. आल्यावर त्याचं डोकं फार दुखू लागलं. टाईम्सचे संपादक शामलाल त्याचे शेजारी आणि दोस्तही. त्यांनी त्याला इस्पितळात तपासून घेण्याचा सल्ला दिला. डी. जी. कसाबसा तयार झाला. इस्पितळात चार दिवस पडून राहिला. डॉक्टर म्हणाले, " तुम्हाला काहीही झालेलं नाही. तुम्ही घरी जा. मजा करा. " डी. जी. घरी आला. शेजारच्या शामलालकडे गेला. घाबरून सर्वांनी आपल्याला इस्पितळात पाठवलं म्हणून सर्वांची त्याने टिंगल केली. गप्पागोष्टी केल्या खाल्लंपिल्लं. घरी आला. झोपला. सकाळी त्याने दुधाच्या बाटल्या घेतल्या. थोडं दूध गरम करून प्यायला आणि चारपाईवर जरा आडवा झाला. तीच त्याची शेवटची विश्रांती ठरली.

म्हणजे जन्मभर चैतन्याने सळसळणाऱ्या डी. जी. चे अखेर काय झालं ? मूठभर थंडगार राख! जन्मभर साधेपणाने राहिलेल्या निगर्वी डी. जी. चे मागे काय उरलं ? मूठभर थंडगार राख ? नाही-नाही. त्याची पुस्तकं ? त्याच्या टेपा ? त्याने घेतलेली असंख्य छायाचित्रे ? त्याची सर्वसमावेशक झोळी ? त्याची प्रागप्रिय चारपाई ? नाही-नाही. डी. जी. च्या मागे उरलं आहे त्याने अखंडपणे जोपासलेलं त्रिभुवनमोलाचं उमदं सहृदयपण, रसिक चोखंदळपण आणि वृत्तीचं अमोल अभिजातपण; आणि ह्या सर्वांच्या मिश्रणातून उमललेली आठवणींची ही चार पांच टवटवीत कमळं!



जून उजाडला...संपत आला
शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश मिळवताना
हैराण झालेला विद्यार्थी नव्या उत्साहात
आता क्लासेसचे उंबरठे
झिजवू लागतो...

हे तेजीत चाललेले कारखाने
हे क्लासेस

# पिढ्या घडवणारे
का
# पिढ्या बिघडवणारे?

विजय वैद्य

उन्हाळ्याची भली मोठी सुट्टी संपून शाळा कॉलेजे उघडतील आणि त्याबरोबरच कोचिंग क्लासेसही. जितकी गर्दी शाळा किंवा कॉलेजात प्रवेश मिळविण्याकरिता होते तितकीच गर्दी विद्यार्थी क्लासेस दारात करतात. पुण्या-मुंबईसारख्या शहरात तर टयुशन क्लासेसचे पेवच फुटलेले. अनेक उत्सुक, भांबावलेले कोवळे चेहरे प्रवेश मिळविण्यासाठी आलेले आहेत, क्लासेसच्या वेळा आदि चौकशीच्या न संपणाऱ्या सत्रात भाग घेत आहेत. हे या मोसमातील नेहमीचेच दृश्य होऊन बसले आहे.

गिरगाव, दादर व इतर अनेक भागात जवळ जवळच्या अनेक इमारतींवरील

क्लासेसचे फलक विद्यार्थ्यांना बोलवत असतात. हे भाग क्लासेसचे अगदी स्टॉक मार्केट झाल्यागत वाटतात. पण जवळजवळ आहेत म्हणून हे क्लासेस रिकामे आहेत असेही नाही. तर बहुतेक क्लासेस अगदी तोबा गर्दीतच चालू असतात. एखाद्या क्लासची ख्याती जितकी मोठी तितक्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या त्यावर अधिक उड्या.

ज्या वर्गात साधारणपणे सुमारे ३० ते ४० विद्यार्थीच बसू शकतात तेथे ७० ते ८० विद्यार्थीही दाटीवाटीने बसलेले असतात. बाके कमी पडल्यास स्टुलांवरही विद्यार्थ्यांची सोय लावली जाते (बिच्यारे विद्यार्थी). काही क्लासेस ज्या खोल्यांतून चालतात तेथे अंधाराचेही बरेच वर्चस्व असते. वारा त्या खोल्याच्या चुकूनसुद्धा वाटेला जात नाही. असे असूनही, हे सर्व सहन करीत विद्यार्थी क्लासला जातात.

संध्याकाळी शाळा आटोपून क्लासला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे कंटाळलेले, थकलेले चेहरे पाहून घ्यावेत, शाळा सुटताच त्यांना क्लासकडे धाव घ्यावी लागते ('शाळा सुटली पाटी फुटली, आई मला भूक लागली...' म्हणून पाटी पुस्तक कोपऱ्यांत टाकून खाऊसाठी चिवचिव करणाऱ्या विद्यार्थ्यांचे ते रम्य दिवस आता जवळजवळ इतिहास जमाच झाले आहेत.) असे असूनही विद्यार्थी क्लासमध्ये जातात, ही वेळ खरी त्यांनी क्रिडांगणावर असायची वा असाच ताजेपणा आणायला मदत करणारी मजा करण्याची पण त्याच वेळी मुले क्लासमध्ये.

पालकही फी वाढीविरुद्ध आरडाओरड करीत असतात, तरीही आपल्या पाल्याला कोणत्यातरी क्लासमध्ये दाखल करून क्लासचीही फीही भरीत असतात. असे का? 'क्लास' या संस्थेला विरोध करणारेही अनेक आहेत. त्यापैकी अनेक शाळा चालक आहेत व ते 'क्लास'वर तावातावाने हल्ला चढविताना दिसतात. 'क्लास' विरोधकांचे आक्षेप म्हणजे 'आजकालच्या जमान्यात नव्या नव्या फॅशन्स येत असतात आणि क्लासला जाणे त्यापैकीच एक असून हे 'फॅड' आता फारच बोकाळले आहे. आठवी, नववी वगैरे खालच्या वर्गातील क्लासला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचारच नको किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही क्लासला जाण्याचेही काही काळ बाजूला राहू द्यात पण विद्यार्थी एस्. एस्. सी. ला गेला की त्याने क्लासला गेलेच पाहिजे असा अलीकडे अलिखित नियमच होऊन गेला आहे.' याच लोकांचा दुसरा आक्षेप असा असतो की शाळेत ज्या शिक्षकांना शिकवणे बिलकूल जमत नाही असे शिक्षक क्लासमध्ये 'उत्तम' कसे काय ठरतात। तेच जाणोत. क्लासवाल्यांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे—आणि एक आक्षेप—त्यावर थोडे स्पष्टीकरणही—की शाळेत विषय शिकवला जातो तर क्लासमध्ये प्रश्नोत्तर पद्धतीने फक्त परिक्षार्थी तयार केले जातात. त्याच्या व्यक्ती विकासाला तर तेथे काहीच वाव नाही, प्रयत्न नाहीत. 'संभाव्य प्रश्न' या सोईस्कर बुरख्याखाली

चक्क पेपर्स फोडले जातात, असाही एक गंभीर आरोप. क्लासच्या नावाखाली पुढं दांड्या मारुन उनाडत असतात आणि शाळेप्रमाणे त्यांच्यावर काहीच वचक नसल्याने त्यांना हे सहज शक्य होतं. म्हणूनच क्लासेसना पिढ्या घडविणारे म्हणायचे की बिघडविणारे ? असाही सवाल आक्षेपवाले पुढे करतात.

क्लास नामक 'कारखान्यांच्या' जाहिरातीमुळे हे 'एक्सप्लॉयटेशन' जोरात चालू आहे. जाहिरातबाजीत काही क्लासवाले इतके तरबेज आहेत की शाळेतीलच एखाद्या कारकुनाला हाताशी धरून विद्यार्थ्यांचे पत्ते ते मिळवितात आणि बेधडक ते पालकांना पोष्ट कार्डस् पाठवितात. व्यक्तीगत लक्ष देण्याचा हा त्यांचा अॅप्रोच पालकांनाही भुरळ पाडून जातो.

पण आक्षेप घेणाऱ्यांचा सर्वांत मोठा आरोप हा आहे की काही दरसाल क्लासवाले विद्यार्थ्यांना लुबाडून आपले उखळ पांढर करून घेतात. त्याचप्रमाणे अयोग्य मार्गाने विद्यार्थी पास करून घेणे वा भरमसाट पैसे घेऊन प्रत्यक्ष परिक्षार्थीऐवजी दुसऱ्याच कोणाला तरी परिक्षेला बसवून त्यांना पास करून घेणे हे अगदी सर्रास चालतं. तरुण व कोवळ्या मुला-मुलींवर याचा परिणाम काय होईल. यात राष्ट्राचें नुकसान आहे. पण या सर्वांच्या मुळाशी आहे. एस्. एस्. सी. चे वाढविले गेलेले अवास्तव महत्त्व.

यातील काही आक्षेपात तथ्य नाही असे किंवा क्लासमधून असे प्रकार चालतच नाहीत असेही नाही. पण एका गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. की सारेच क्लासेस आणि त्यांचे संचालक असे नाहीत. काही तसे जरूर आहेत. पण चांगले क्लासिस व चालक यांचे प्रमाण निश्चितच अधिक आहे. दुसरे म्हणजे. आपली शिक्षणपद्धतीच अगदी सदोष आहे. त्यामुळे नाही म्हटले तरी क्लासेस ही आजची गरजच झाले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांचा चांगलाच उपयोग होत आहे. काही सामाजिक व आर्थिक कारणामुळेच क्लासेसचा उदय झाला असून त्याचे ठाम अस्तित्व याच कारणामुळे टिकून राहिले आहे. त्यातच भर म्हणजे शाळाही क्लासेसच्या वाढीला कारणीभूत ठरल्या आहेत.

काही शाळांत शिक्षणाची हेळसांड चालू आहे. अनेक शिक्षक दुसरी नोकरी मिळेपर्यंत स्टेपिंग स्टोन म्हणून शिक्षकी पेशात रहातात. शिक्षकांचा स्वतःचाच दर्जा खाली मग ते विद्यार्थ्यांना विशेष ज्ञान ते काय देणार, त्यातच मॅनेजिंग कमिटी व संचालक अगदीच नाहीतर प्राचार्यांचे जबरदस्त प्रस्थ, यात विद्यार्थ्यांसाठी कष्ट घेणाऱ्या शिक्षकाचे मरण होते. त्याला आवश्यक तेवढे याबाबतीत स्वातंत्र्यही मिळत नाही. उलट काहीना काही कारणावरून अशा समर्थ व अत्यंत चांगल्या शिक्षकांना बाहेरचाच मार्ग दाखविला जातो. आर्थिक परिस्थितीने नाडला गेलेला शिक्षक शाळेच्या पगारात भर म्हणून क्लासमध्ये शिकवतो वा खाजगी शिकवण्या करतो. शाळेपेक्षा क्लासमध्ये त्याला आवश्यक तेवढे स्वातंत्र्यही मिळते. अगदी

सहजसाध्य स्वातंत्र्य मिळाल्याने त्याच्या शिकवण्याच्या कलेला बहर न आला तरच नवल. ' टीचर ऑफ क्वालिटी ' आपल्या टर्मस् डिक्टेट करू शकतो त्या क्लासमध्येच; पण मिळणाऱ्या वेतनाचा मोबदला त्यालाही द्यावाच लागतो. कारण विद्यार्थी फी देऊन शिकत असतो, तो चिचोके मोजत नाही, त्यामळे कुवत नसलेला शिक्षक क्लासमध्ये टिकू शकणेंच अशक्य. तसे पहाता क्लासमध्ये शिकवणे ही एक प्रकारची त्याच्या कलेची कसोटीच असते. अनेक शाळांतून, मग त्या चांगल्या असोत वा कमी दर्जाच्या, पण शिक्षणातील मूलभूत गरजा भागवायला तेथील चांगले शिक्षकही असमर्थ ठरतात आणि काही शाळांचे संचालक तर अनेकदा तज्ज्ञ असण्यापेक्षा अज्ञच असतात. त्यामुळे शिक्षकाकडून होणाऱ्या प्रयत्नांनाही खीळच बसते. त्यांनी विद्यार्थ्यांकरिता काही विशेष पद्धतींचा (शिकविण्याच्या) अवलंब केला, तर त्यांच्याकडून (अशा अज्ञ संचालकांकडून) योग्य प्रतिसादही मिळत नाही मग हे शिक्षक शाळेतील शिकवण्यात कमी रस घेऊ लागले तर तो त्यांचा दोष नाही.

या सर्वांचे मूळ आहे आपल्या शिक्षणपद्धतीत. परिक्षांना आपल्याकडे अघोरी महत्त्व आलेले आहे. त्यात विद्यार्थी भरडले जातात आणि शिक्षक दमतात. विद्यार्थ्यांच्यात असलेल्या गुणांची कदरच केली जात नाही. त्यांचे परिक्षेतील यश, मग ते पढीत का असेना, त्यालाच अधिक महत्त्व. त्यामुळें जीवनातील यशाकडे वाटचाल करताना शिक्षणातील ध्येय बाजूला राहून शेवटी प्रभावी ठरते परीक्षा व त्यातील यश.

पुढील यशाची पायरी अंगभूत हुषारीवर अवलंबून न रहाता टक्केवारीला महत्त्व प्राप्त झाल्याने ती वाढविण्यासाठी शाळेव्यतिरिक्त अन्य मार्गांचा अवलंब करणे विद्यार्थ्यांना भागच पडते.

खाजगी शिकवणी ठेवणे महागाईच्या काळात फारच थोड्यांना शक्य होते म्हणूनच क्लासचा मार्ग विद्यार्थ्यांपुढें असतो आणि एक गोष्ट जरूर सत्य आहे की, आजचे अनेक चांगले चांगले शिक्षक शाळेपेक्षा क्लासमध्येंच आहेत. एक दोन क्लासेसमध्ये फेरी मारताच हे सहज लक्षात येईल. त्यांच्या शिकवण्याचा फायदा मग मुले क्लासला नाव घालून करून घेतात. अशा वेळी क्लासेसच्या इतर गैरसोयींकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष करूनही विद्यार्थी क्लासमध्ये जातात.

शाळा ही गरजेपायी सतत चालू रहाणारी संस्था आहे, म्हणून अनेकदा शाळांतून गलथानपणा पहायला मिळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे पुरेसे लक्षच दिले जात नाही.


अलीकडे पालकांनाही आपल्या पाल्याचा उत्कर्ष केवळ शालेय शिक्षणावर तग धरू शकेल असे वाटत नाही. मग तेही त्यांच्या क्लासमध्ये दाखल होण्याआड येत नाहीत.

शहाळं खाण्याची
ही एक पद्धत

पण ही
त्यापेक्षांही चांगली



भारतातील सर्वोत्कृष्ट नारळांच्या कुरकुरीत स्वादिष्टपणाची मधुर चव तुम्हांला ब्रिटानिया नाईस बिस्किटांत आढळेल. ती उत्तम स्वादाची नि कुरकुरीत असून त्यांवर उत्तम प्रकारची शुभ्र साखर पसरलेली असते. ब्रिटानिया नाईस. वैशिष्ट्यपूर्ण स्वादाची वैशिष्ट्यपूर्ण बिस्किटे.




**ब्रिटानिया
नाईस
बिस्किटे**

भारतातील सर्वोत्कृष्ट बिस्किटे ब्रिटानिया

विद्यार्थ्यांमधील परिक्षेत यश मिळविण्याबाबतची तीव्र आढ लक्षात घेऊन काही क्लास चालक त्याचा फायदा घेतात व मग सर्व अयोग्य प्रकारांना ऊत येतो. यातच पैसे व शिक्षण या दोन्ही बाबतीत विद्यार्थ्यांची लूटमार होते. गिरगावातील एका क्लास चालकाने एका गरीब विद्यार्थ्याकडून २५० रु. घेऊन त्याला एस्. एस्. सी.ला हमखास यश मिळवून देतो म्हणून सांगितले. यश राहिले बाजूलाच पण त्याचा फॉर्मही बोर्डाकडे पाठविण्यात आला नाही व ते सर्व पैसे गडप झाले.

सुमारे २०० रुपयांपासून ५००० रुपयांपर्यंत पैसे मोजले असता नुसते पास होण्यापासून ते डिस्टिंग्शन मिळविण्यापर्यंतची सर्व 'व्यवस्था' करणारेही काही क्लासेस आहेत व काही वेळा प्रत्यक्ष पैसे मोजणारा विद्यार्थी परिक्षेला न बसताही पास होतो किंवा एखादा डफ्फर विद्यार्थी ७० टक्क्यांहून अधिक टक्के गुण मिळवू शकण्याचे हे सर्व प्रताप 'असे काही क्लासेस' करू शकतात, पण त्याच्या 'कर्तृत्वा'-मुळेच इतर अनेक चांगल्या क्लासेसनाही बदनाम व्हावे लागते.

व्यापारी प्रवृत्ती प्रत्येक ठिकाणी आहेच. 'शाळा हे शिक्षणाचे मंदिर आहे व शिक्षक हा त्यातील पुजारी आहे'चा घोष करणारे अनेक तथाकथित शिक्षण तज्ञांनीही हा बाजार मांडलेला आहेच की. नाहीतर देणग्या, वा खोटयानाटया मार्गाने अनुदाने घशात घालून आपल्या सात पिढयांची सोय अशांनीही केली आहे.

क्लासेस हा व्यवसाय आहे पण व्यापारी प्रवृत्ती सर्वत्रच आहे असे नाही. दादरच्या एका प्रख्यात क्लासमध्ये प्रत्येक शिक्षकाला तो जेवढया विद्यार्थ्यांना शिकवील त्यांच्या फीपैकी निम्मी रक्कम वेतन म्हणून मिळते. याचाच अर्थ एखादा शिक्षक जेवढे आत्मियतेने व सुंदर शिकवील तेवढी त्याच्या वर्गात गर्दी अधिक. त्यामुळे अशा क्लासमधील शिक्षक जबाबदारीने व चांगले शिकवतो. त्यामुळे तेथील प्रत्येक शिक्षक रु. ५०० पेक्षा अधिक मिळवितो तर काहींचे उत्पन्न २॥ ते ३ हजार रुपयांच्या घरात जाते. त्या क्लासचा आजचा व्यापही प्रचंड आहे. सुमारे १० हजार विद्यार्थी त्यांच्या या क्लासच्या निरनिराळया शाखातून प्रवेशासाठी अर्ज करतात आणि त्यांच्याकडील शिक्षकांची संख्या सुमारे १५० च्या आसपास आहे. एखाद्या शाळा वा महाविद्यालयापेक्षाही हे सारे प्रचंड आहे. क्लासमध्ये व इतर काही क्लासेसमध्ये आठवीपासून मुंबई व महिला विद्यापीठांच्या एम. ए. एम. एस्सी. त्याचप्रमाणे एन्. डी. ए. आय्. ए. एस्. डफरिन व पी. एस्. सी. वगैरे कोर्सेसचीही तयारी करून घेतली जाते. तर काही क्लासेसमधून, शाळांतूनही सापडणार नाही अशा चार्टस्द्वारे आधुनिक पद्धतीने इंग्रजी शिकवलं जातं. तेथे प्रयोगांची सोय असते एखादी छोटी लायब्ररी असते आणि काही क्लासेस तर चांगली टक्केवारी मिळविणाऱ्यांना बक्षिसेही देतात.

'खरं म्हणजे शाळांतूनच शिक्षण पूर्ण होण्याच्या गरजा भागल्या गेल्या पाहिजेत

व हे सारे प्रयत्न तेथेच होणे आवश्यक आहे. सहा तास शाळा आणि दोन तास क्लासमध्ये कोवळ्या पिढीने घालविणे वाईटच. तेव्हा शाळेतील कमतरतेची कोंडी 'क्लास'ने सुटणार नाहीच.' असे उद्गार एका सुप्रसिद्ध क्लासच्या संचालकांनी काढले.

क्लासेसची गरजच असेल तर त्यादृष्टीनेही सर्वाकडून चांगले प्रयत्न होणे आवश्यक आहे. शाळा जेथे कमी पडतील तेथे क्लासेसने चांगले काम करून दाखवायला पाहिजे. कारण सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मध्येही शिक्षणाची आवड निर्माण होऊ लागली आहे ते इर्षेने शिकत आहेत. निरनिराळ्या पाळ्यांतून काम करणारे कामगार शाळेत जाऊ शकत नाहीत पण त्यांच्या सोयीनुसार व्यवस्था करणाऱ्या क्लासेसमध्ये जाऊ शकतात त्यांची क्लास ही गरज आहे.

बहि:शाल अभ्यासक्रम करून परिक्षेला बसणाऱ्यांनाही क्लासेसचा फायदा होतो. त्याचप्रमाणे पी. एस्. सी. आय्. ए. एस्. आय्. आय्. टी व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांची सोयही काही क्लासेसमधून होऊ लागली आहे पण यापेक्षाही महत्वाचे म्हणजे एस्. एस्. सी. बोर्डाच्या नियमानुसार ७ वी पास झालेला पण १९ वर्षांवरील कोणालाही खाजगीरितीने सरळ एस्. एस्. सी. ला बसता येते. त्यांची अभ्यासाची सोय शाळा करू शकत नाही. ही गरज क्लासेसच भागवितात. परवा पहिला आलेला कुमार मोतीवालाही क्लासला जात होताच की. क्लासेसवर नियंत्रण ठेवण्यासाठी पाहिजे तर सरकारने त्यांच्या मान्यतेसंबंधी विचार करून त्यांचे इन्स्पेशन करावे की ज्याद्वारे सध्या क्लासेसपुढे असलेले प्रश्नही सुटतील व त्यात सुसुत्रताही येईल आणि मुख्य म्हणजे वाईट गोष्टींना आळा बसू शकेल.

¤ ¤ ¤

## क्लासेसचा पसारा कसा वाढला ?

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लोकात शिक्षणाबद्दल आस्था निर्माण झाली आणि पदवी मिळविण्याकडे त्यांचा कल वाढू लागला. पंजाब विद्यापीठाच्या बहि:शाल अभ्यासक्रमांना बसणाऱ्यांची संख्या वाढू लागली व त्यांना योग्य ते शिक्षण देण्याकरिता 'अहुजाज् क्लासेस' मुंबईत सुरू झाले.

त्या आधी गिरगावात श्री. भिडे गणित व इंग्रजी शिकवीत असत. (मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना) खरे बंधु, व पटवर्धनही तसे या क्षेत्रात होतेच. पण बेसिक इंग्रजीच्या कोर्स पाठोपाठ मॅट्रिकचे सारेच विषय (सात विषय) शिकविण्याची सोय श्री. म. मं. पिंगे यांनी केली व त्यानंतरही पद्धती सर्वत्रच दिसू लागली.

# कविता

## होडी

वेद शोधून झाले...आयुष्य कळले नाही
पृथ्वी हिंडून आलो.. ओंजळ रिकामी राही
ग्रंथपुराणाच्या नुसत्या चिध्या चिध्या झाल्या
पाय भेगाळून गेले याहून साध्य नाही
आणि सुखदुःख तरी म्हणायाचे कशाला ?
काळजाने काळीज ओढायाचे कशाला ?
सारेच अगम्य काम क्रोध वगैरे वगैरे
अजूनही कळाले नाही आपण भीत आहोत
कशाला ?

दिशाहीन पाण्यात एक आंधळा नावाडी
एक अनामिक छिद्र अशी अशाश्वत होडी
बुडणे निश्चित, तरीसुद्धा प्राणवायूसाठी
शरीराची का रे अशी हातपाय झाडी !

— दत्ता हलसगीकर

## सुखी

तसा कोण सुखी आहे या जमिनीवर
म्हणून का उभ्या जन्मालाच टांगायचे फासावर?
रुळ बदलले जातात...गाडी भलतीकडेच जाते
स्वप्नात नसलेल्या भिकार गावात जाऊन पडावे
लागते.

भरल्या लग्नमंडपात माणसाने कधी रडू नये
आणि गाण्याच्या मैफलीत बेसूर गाऊ नये
आयुष्याचे सुतक पाळल्याने काय मिळेल जगून ?
भणंग आयुष्यापासून सुखे जातात पळून
आयुष्याचा हिशेब चुकतो...नाही असे नाही
डोळ्यापुढे का उघडून ठेवायची हिशेबाची वही?
असली दुःखे मनात पुरावीत, वरून लोटावी माती
खोटी असली तरी उमलून येतील कोवळी हिरवी
पाती !

— दत्ता हलसगीकर

## सरळ रेषा –

असे कसे तुझे हात
सदा बर्फात गारठलेले
अशी कशी तुझी भाषा
व्यवहाराच्या दगडावर घासलेली
अशी कशी तुझी नजर
शून्यात सदा लागलेली
अशी कशी रे तुझी रीत
घडवीत नाही काहीच विपरीत

– आशा भाजेकर

## आस्वाद

जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करण्यासाठी मन जेव्हा तत्त्वज्ञानाची पाठपुरवणी करते तेव्हा एका निराश रितेपणाच्या निश्चितीविना हाती काही उरत नाही. पृथ्वीभर हिंडणे झाले तरी आपली ओंजळ रिकामीच राहते. पाय मात्र भेगाळतात. 'होडी' या कवितेत दत्ता हलसगीकर यांनी या मनःस्थितीचे चित्र रेखाटले आहे. जिज्ञासा, प्रेम, भावना सारे या क्षणी निरर्थक वाटत आहे. मनावरचे दडपण जाणवत आहे; पण त्याचे कारणमूळ समजत नाही. या पोकळ अवस्थेत मग दिसू लागते एक चित्र. दिशाहीन पाणी. त्यातला आंधळा नावाडी. होडीला छिद्र पडलेले. सगळ्याच दृष्टींनी असे नकाराचे रिकामे रंग. बुडण्याची निश्चिती असूनही शरीराची चाललेली तडफड–'हातपायझाडी' ही एवढी एकच यातली हालचाल तीही गोंधळल्या गतीची. अनिश्चित, केविलवाणी. पण हालचाल. 'हातपायझाडी' हे नवे विक्षिप्त भाववाचक नाम हलसगीकर यांनी फार सुरेख वापरले आहे. दृश्यवेदनाचे परिणाम त्यातल्या नवेपणाला लाभले आहे.

दत्ता हलसगीकर यांच्या 'सुखी' या कवितेतून जीवनाकडे पाहाण्याचा एक समजूतदार आशावादी दृष्टिकोन मनोगम्यरीतीने व्यक्त झाला आहे. 'जगी सर्व सुखी असा कोण' नसल्याचे सर्वांनाच माहिती आहे. पण तरीही माणसे वैतागतात, जन्माची रखरख करून घेतात, उभ्या जन्माला फासावर टांगतात. अशांच्याविरुद्धचे

आपले मत इथे कवीने मांडले आहे. 'उभ्या जन्माला फासावर टांगणे' ही कल्पना फार अर्थपूर्ण आहे. मरणान्तीच्या यातना जन्मभर सोसत राहण्याचा आततायीपणा, आपणच आपल्याशी मांडलेला वैराकार त्यातून व्यक्त होतो. रूळ बदलून गाडी भलतीकडेच जाणे व त्यामुळे स्वप्नात नसलेल्या भिकार गावात जाऊन पडावे लागणे, भरल्या लग्नमंडपात रडणे, गाण्याच्या बैठकीत बेसूर गाणे, हिशेबाची वही उघडून ठेवणे ही सगळी व्यवहारातली उदाहरणे आहेत. पण ती समजावून सांगण्याच्या पद्धतीने आलेली नसून अनुभवाला रेखण्यासाठी आलेली असल्याने प्रतिमांच्या ढंगातली आहेत. जीवनाविषयीची एक नवी जाण त्या सर्वांतून विणलेली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर दुःखे मनात पुरून वर माती लोटावी ही कल्पना आणि 'खोटी असली तरी उमलून येतील कोवळी हिरवी पाती' हा रम्य विश्वास फार परिणाम करून जातो. सर्व काही सहन करून, पचवून जीवनाला सजगपणे सामोरे जाण्याची ही वृत्ती आहे. त्यातून उमलून येणाऱ्या कोवळ्या पात्यांचे भान या वृत्तीला आहे. ही पाती खोटी असली तरी तिला त्याची पर्वा नाही. ती हिरवी आहेत हेच पुष्कळ आहे, पुरेसे आहे.

आशा भाजेकर यांच्या 'सरळ रेषा' या कवितेत धोपटमार्गी प्रेमानुभवाबद्दलची तक्रार काव्यमय शब्दांत व्यक्त केलेली आहे. प्रेमाचा अनुभव हा विलक्षण प्रक्षोभक असावा, ज्वलंत अव्यवहारी असावा ही नेहमीची अपेक्षा. त्यातले विपरीत सोसायची मनाची तयारी. पण प्रत्यक्षात विपरीत घडतच नाही. सर्वत्र सरळ रेषाच प्रत्ययास येते. म्हणून अपेक्षाभंग. दुखावणारा नाही, पण बेचैन करणारा. उत्कंठा ताणणारा. मनातल्या भावनांची प्रतीती आलेली असली, तर प्रत्यक्षात 'त्याचे' हात मात्र 'सदा बर्फात गारठलेले' आहेत. धग तर नाहीच, पण ऊबही जाणवत नाही. म्हणून तक्रार. पण तक्रारही जवळिकीची. दुराव्याची नाही. 'व्यवहाराच्या दगडावर घासलेली भाषा' ही प्रतिमा नावीन्यपूर्ण आणि प्रत्ययकारी आहे. भाषेचा गुळगुळीतपणा आणि त्यामागचे कारण त्यात एकत्र रेखलेले आहे. शून्यात लागलेली नजर आणि ही असली भाषा यातून निष्क्रीय उदासीनतेच्या अपेक्षाभंगाचे एक चित्र सांधले जाते.

— रसिक

# असा हा दादा होता तरी कोण ?

# कोंड

दत्तात्रय जोशी

गेले तीन दिवस इन्स्पेक्टर गोखले कातावून गेले होते.

तीन निरनिराळे रिपोर्ट त्यांच्याकडे आले होते. आणि त्यातून त्यांना काय करावे याचा उलगडा होत नव्हता. वास्तविक असे रिपोर्ट फार महत्वाचे नसतात. पण चोरीचा रिपोर्ट त्यांना विशेष महत्वाचा वाटला होता.

एक मोटार लॉंच चोरीला गेल्याचा हा रिपोर्ट म्हणजे इन्स्पेक्टर गोखल्यांना एक आव्हान होते. यांत्रिक होडी ठेवायला लायसन्स लागते. तिची नोंदणी असते. आणि असं असताना होडी चोरीला जाते म्हणजे नक्की चोरटी आयात करणाऱ्यांचे हे कृत्य असलं पाहिजे असं मत इन्स्पेक्टर गोखल्यांनी करून घेतलं होतं. पण लगेच त्यांचं दुसरं मन म्हणे – चोरटी आयात करणाऱ्याकडे इतर साधनं पुष्कळ असतातच की ! त्यांना वाटले तर ते होडी विकत घेऊ शकतात. मग ही चोरी कुणी आणि कशासाठी केली असावी ? त्यांना या प्रश्नाचे उत्तर गेले तीन दिवस मिळालं नव्हतं. त्यांना त्यामुळंच स्वस्थता लाभली नव्हती. केव्हा लाभेल हे सांगणं अवघड होतं. त्याच दिवशी दुसरा एक रिपोर्ट मिळाला होता.

रिपोर्ट काही फार महत्वाचा नव्हता, पण तेवढाच सतर्क राहायला सांगणारा होता. माटुंग्याचा कुप्रसिद्ध दादा आन्ना पटेल सायंकाळपर्यंत कुठेच दिसला नव्हता. हा आन्ना पटेल म्हणजे साऱ्या दादांचा दादा. मी मी म्हणणारे दादा त्याच्यापुढे हार खात. भरदार शरीर-



यष्टीचा, तेवढचाच ताकदीचा हा दादा म्हणजे पोलिसांना पडलेला पेच असे. सहसा कुणाच्या वाटचाला न जाण्याचा याचा खाक्या. इतरांनी दिलेल्या मानधनावर जगणारा हा दादा वेळ पडला तर डाका घालीत असे एवढी माहिती इन्स्पे. गोखल्यांना होती. शिवाय तो ज्या ज्या वेळी असा गुप्त होई त्या त्या वेळी कुठेतरी डाका पडल्याचे वृत्त येई. परंतु तपासात त्याला गोवता येईल असा कुठेच पुरावा मिळत नसल्याचेही त्यांना माहीत होते. त्यामुळे आन्ना पटेल दिवसभर दिसला नाही ही खबर येणं म्हणजे पुढचं वृत्त ऐकायला तयार रहा असं सांगणंच होतं. पण गेल्या तीन दिवसात कुठं डाका पडल्याचं वृत्तही नव्हतं. त्यामुळं त्यांच्या कातावण्यात भर पडली होती. मग हा गेला तरी कुठे ? हा प्रश्न त्यांना सोडवता आला नव्हता.

त्याच दिवशी त्यांना वर्तमानपत्रांत एक वृत्त वाचल्याचं आठवलं. मूक चित्रपट जमान्यातील नायिका पुतळीबाई निधन पावल्याचं ते वृत्त होतं.

एकेकाळी चित्रपटसृष्टीचा आधार असणारी ही बाई निर्धन अवस्थेत झोपडपट्टीत निधन पावल्याचे ते वृत्त होते.

इन्स्पेक्टर गोखल्यांना याचं दुःख झालं होतं.

त्या मनःस्थितीत असताना तिसरा रिपोर्ट मिळाला होता.

आन्ना पटेलाने आपल्या सगळ्या दादांना बोलावून घेऊन प्रत्येकाला काही ना

काही बक्षीस दिलं होतं. प्रत्येकाकडून कर वसूल करणाऱ्या दादानं आज काही ना काही बक्षीस दिलं होतं.

हा रिपोर्ट म्हणजे आश्चर्याचा धक्का होता. कारण बक्षिसामध्ये आन्नाला अत्यंत प्रिय असणारा ज्ञानेश्वरांचा फोटो त्यानं एका शाळकरी पोराला दिला होता. आणि व्यवस्थित सांभाळ म्हणून सांगितलं होतं.

हे सारं ज्यान कळवलं होतं तो अत्यंत विश्वासू खबऱ्या म्हणून प्रसिद्ध होता. आन्ना पटेलानं असं का करावं याची कारणं परंपरा इन्स्पे. गोखल्यांना सांगता आली नव्हती.

गेले तीन दिवस या गोष्टींचा ते विचार करीत होते पण त्यांना काहीच उमगलं नव्हतं. त्यामुळंच ते कातावले होते.

आजही ते तोच विचार करीत होते.

एवढ्यात त्यांना पोलिसांनं ताजी डाक आणून दिली.

एका नवख्या लिफाप्यानं त्यांचं लक्ष वेधून घेतलं.

नित्याप्रमाणे कार्यालयीन कागदपत्र पाहून झाल्यानंतर आणि योग्य त्या सूचना दिल्यानंतर त्यांनी तो लिफापा फोडला.

वास्तविक त्यांना तो आधीच फोडून वाचावा अशी इच्छा झाली होती. पण कर्तव्यामुळं भावनेला त्यांनी आवर घातला होता.

पत्र त्यांनाच उद्देशून होतं.

डाक देणारा पोलीस इन्स्पे. गोखल्यांच्या चेहऱ्यावरचे बदलते भाव पाहून आश्चर्यचकित झाला होता.

इन्स्पे. गोखल्यांना आता सुखमिश्रित दुःख झालं होतं.

तीन दिवस कातावणाऱ्या घटनांचा उलगडा झाला होता.

तिन्ही घटनांचा परस्पर संबंध होता, हे पाहून त्यांना आश्चर्य वाटलं होतं. दुःखही झालं होतं.

न राहवून पोलिसांनं प्रश्न करताच गोखल्यांनी ते पत्रच वाचायला दिलं होतं. पोलीस पत्र वाचत होता.

पत्राच्या अग्रभागी ॐ हा शब्द पाहताच पोलीस क्षणभर गोंधळला होता. अशा प्रकारचे पत्र त्याला पोलीस कचेरीत पहायला मिळालं नव्हतं. हस्ताक्षर सुंदर होतं. साहेब आपली चेष्टा करीत असावेत म्हणून पत्र न वाचताच त्यानं पत्र कुणाचं हे पाहण्यासाठी पत्राच्या शेवटी पाहिलं अन् पत्राच्या शेवटी आन्ना पटेल हे नाव वाचताच तो क्षणभर हतबुद्ध झाला. कारण आन्नाचं हस्ताक्षर एवढं सुंदर असेल, तो साक्षर असेल असं त्याला वाटलं नव्हतं. पण ते सत्य होतं.

पत्रात लिहिलं होतं.

स. न. वि. वि.

आता यापेक्षा दुसरं काहीच लिहू शकत नाही. इच्छित नाही. यापुढं तुम्हाला माझं पत्र कधीही येणार नाही. म्हणून केवळ नमस्कारावर भागवितो. साष्टांग असं लिहणं मला जमणार नाही हेही एक कारण आहेच. तेव्हा राग न धरता असलेला राग सोडून क्षमा करावी एवढी विनंती करून विषयाकडे वळतो.

हे पत्र जेव्हा तुमच्या हाती पडलेलं असेल तेव्हा मी या जगाचा कायमचा निरोप घेतलेला असेल. तेव्हा कृपया माझा शोध करू नये. एकाएकी हा निर्णय घेतला आहे असं मानू नका. पूर्ण विचार करूनच मी निर्णय घेत असतो हे आपणास माहीत आहे. या निर्णयापर्यंत येऊन पोहोचायला एक निमित्त झालंय एवढंच. अन् ते म्हणजे स्व. पुतळीबाईचा मृत्यु ! एकेकाळी सारा भारत वर्षभर जिचा बोलबाला अशी व जी चित्रपटसृष्टीची प्राणदाती म्हणून प्रसिद्ध अशा बाईला हलाखीमध्ये, विपन्नावस्थेत मृत्यु यावा, जिच्या कर्तृत्वावर आजची चित्रपटसृष्टी डौलात उभी आहे, तिनं तिच्याकडे साफ दुर्लक्ष करावं, तिच्या चरितार्थाची चौकशी करू नये, यापेक्षा दुसरी कोणती कृतघ्नता असू शकेल ? आज यशाच्या शिखरावर असणाऱ्यांची अवस्था उद्या अशीच होणार नाही कशावरून ? मला या विचारानं सुन्न केलं. यापूर्वी 'गौरी' या चित्रपट-नायिकेची अवस्था अशीच झाली होती हेही मला माहीत होतं म्हणून मी आत्मघात करण्याचा निश्चय केला आणि तो पार पडला आहे.

पुतळीबाईच्या अंत्यसंस्कारानंतर मी तडक घरी आलो. माझ्या सर्व आश्रयदात्यांना मी बक्षिसं दिली हे वृत्त तुम्हाला एव्हांना मिळालं असेलच. खंडणी म्हणून मिळणारा पुष्कळसा पैसा मी स्वतःसाठी कधीच वापरला नाही. थोड्याच दिवसांत त्यासंबंधी माहिती तुमच्या कानावर येईल आणि तुम्ही ती सत्य असल्याचे मानून त्याप्रमाणे कार्यवाही करावी हाही या पत्राचा दुसरा हेतू आहे. असो. तर माझ्या आश्रयदात्या दादाकडून मिळणारी खंडणी घेणं हे मी करीत असे यालाही एक कारण होतं. समाजात खरोखर ज्यांना आवश्यकता असते अशांना सहाय्य मिळत नसते हा माझा अनुभव होता, लहानपणी मला शिकायची इच्छा असूनही परिस्थितीमुळे मला बरीच वर्षं फुकट घालवावी लागली. अर्थात् त्याचा विनियोग मी कुस्ती खेळण्यांत, बलदंड बनण्यात केला. आणि मुंबईस पळून येऊन हा दादागिरीचा व्यवसाय सुरू केला. शिकायची इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण झेपेना, समाजाकडे याचना करूनही सहाय्य मिळेना. शिक्षण नसल्यामुळे नोकरी नाही. अशा अवस्थेत निरुपाय म्हणून दादागिरी सुरू केली. प्रथम या धंद्यात प्रवेश मिळेना. मनही साथ देत नव्हते. पण टीचभर पोट स्वस्थ बसू देईना. एक दोन दादाना हात दाखवून शक्तीचा अंदाज देताच पाय स्थिरावू लागले. प्रत्येकजण समाजास गिळत होता. समाज प्रत्येकास मिळत होता. अशा स्थितीत मी प्रत्येक दादाला नामोहरम करून खंडणी वसूल करीत होतो. त्यांनाही सहाय्य करीत होतो.

माझा इतर शैक्षणिक अभ्यास चालू होता. पण कोठल्याच विद्यालयीत नाव नसल्याने ते कुणाच्या लक्षातही आले नाही. मी कुठेही सही केली नाही. त्यामुळे इतर दादा-प्रमाणेच हाही अनपढ असावा अशी आपली समजूत होती. असो. पण माझं शिक्षण झालं होत. मी हिंदी, इंग्रजी या भाषाबरोबर कन्नड, तामीळ भाषा सुंदर बोलू शकत असे. हे सारं मी योजनापूर्वक दडवून ठेवलं होतं. असो. आता त्याचा उपयोग नाही. तेव्हा मला मिळणारा पैसा मी बँकेत ठेवला आहे याची कुणकुण केव्हा ना केव्हा तरी लागणारच. त्याआधीच त्याचा विनियोग करावा म्हणून आमचे आश्रय-दाते दादा यांना मी काल बोलावून घेतलं. त्यांना आवडणाऱ्या वस्तू त्याना भेट दिल्या. मूल्यवान वस्तू भेटीदाखल दिल्या असं त्यांना वाटेल. पण मी त्यांचेच पैसे त्यांना दिले हे मात्र त्यांना उमगलं नाही. ते खूष आणि मीही. तसं पाहायला गेले तर मी अंशतः ऋणयुक्त झालो होतो.

समाज माझं काही देणं लागतो, मी समाजाचं काही देणं लागतो, या उद्देशानं उरलेल्या पैशाचा मी विश्स्त केला. त्याप्रमाणे सर्व कागदपत्र येत्या दोन चार दिवसात आपणाकडे पोहोचावेत अशी व्यवस्था केलीय. आपलं सहकार्य मिळावं ही अंतिम इच्छा.

आता तिसरी गोष्ट.

मी रात्रौ यांत्रिक होडी चोरणार आहे. आवाज न करता हे सारं करता यावं यासाठी प्रथम मी ती वल्ह्यानं वल्हवीत घेऊन जाईन आणि मग यंत्र सुरू करून भर समुद्रात जाणार आहे. सुमारे ४० मैल दूर जाता यावे एवढे इंधनही बरोबर घेतले आहे. तेव्हा तितक्या अंतरावर गेल्यानंतर मी समुद्रात स्वतःला झोकून देऊन आत्मार्पण करीन. होडी शक्यतो परत यावी अशी व्यवस्था करीन. पण जमल्यास शोध करू नये. आणि इतरावर आळ घेऊ नये. असो. शेवटची एकच विनंती, आपलं काम गुन्हेगारांना शोधून शासन करण्याचं आहे. काही अधिकारी दक्ष आहेत, प्रामाणिक आहेत. परंतु आपणासारखे, तुम्ही नव्हे–बरेचसे अधिकारी निरपराध व्यक्तीना सतावतात हे बरे नव्हे असे वाटते. तेव्हा तुम्ही अशा अधिकाऱ्यांकडे लक्ष ठेवावे. आणि समाजाचे रक्षण करण्याचे कार्य असताही जे भक्षण करतात अशा अधिकाऱ्यांना शासन करून निकोप कारभार कसा होईल इकडे लक्ष द्यावे एवढी विनंती.

पत्र बरेच लांबले. पण निरुपाय होता,

आपणास कष्ट दिले आहेत म्हणून क्षमा मागतो आणि पत्र पुरे करतो.

आपला

आन्ना पटेल.

पुनश्च–यदा कदाचित् माझं शव सापडलं तर दहन संस्कारानंतर माझी राख

आळंदी येथ इंद्रायणीत टाकावी. कारण माझ्यासारख्या समाजकंटकाचा उद्धार करण्याचं सामर्थ्य त्या पवित्र मातीत निश्चित आहे, असा माझा विश्वास आहे. आणि शव सापडलं नाही, तरीही मला आनंदच वाटेल. कारण, मी शेवटी कुणाचे तरी अन्न झालो असेन. जसं जमेल तसं करावं.

"जेव्हा जेव्हा मी दोन तीन दिवस गुप्त झाल्याचा रिपोर्ट तुमच्याकडे यायचा त्या प्रत्येक वेळी मी माऊलीच्या दर्शनाला आळंदीला गेलेला असे. कारण त्यायोगे मला मानसिक शांती लाभे. असो, आता ते होणे नाही. नाही का ?"

पत्र वाचून पुरे करताच पोलीस क्षणभर सुन्न झाला. वास्तविक तसं त्यात काहीच नव्हतं. पण आन्नाची इच्छा वाचून त्याला वाटलं. हा असा होता तर !

घडी करून पत्र परत देत असता, पोलिसाने गोखल्यांकडे पाहिले, इतकावेळ ते विचार मग्न होते. त्यांचे कोडं सुटलं होतं. तीन दिवस सहन करीत असलेला मनःस्ताप संपला होता असं त्यांना वाटलं होतं. पण क्षणभरच.

आन्नानं असं हे जे केलं ते का ? हा एकच प्रश्न त्यांच्यापुढं होता.

पोलिसांना दरारा वाटावा, दादांना आपला दादा वाटावा, समाजाला देणेकरी वाटावा असा हा दादा होता तरी कोण ? समाज भक्षक की समाज रक्षक ?

कोडं गुंतागुंतीचं होतंय एवढं गोखल्यांना जाणवलं. या दादासाठी, ज्यानं त्याना तीन दिवस सतावलं होतं त्या दादासाठी त्यानं निष्कारण आत्मघात करून घेतलाय म्हणून त्यांच्या डोळ्यांत दोन आसवं गोळा झाली होती.



# पुस्तके

केशव मेश्राम

## वेलबुट्टी वेलबुट्टी वेलबुट्टी

## स्वतंत्र आणि वेगळी

मोजके पण वैशिष्टयपूर्ण लेखन करणाऱ्या श्री. ए. वि. जोशी यांचा हा दुसरा कथासंग्रह. त्यांच्या पहिल्या, ' कृष्णाकाठचे देव ' या कथासंग्रहापेक्षा ' वेलबुट्टी ' या संग्रहातील बारा कथांचे अनुभवविश्व अधिक तरल, संपन्न व संमिश्र आहे. स्त्री–पुरुष, शाळकरी–कॉलेजियन, भेकड व बेदरकार आणि अगतिक अशा साऱ्यांची भावचित्रे श्री. जोशी आटोपशीरपणे काढतात. वरिष्ठ मध्यमवर्गातील व्यक्तींचे आयुष्य, त्यांची सुखदुःखे व रितेपण, त्यांच्या सर्वस्वाला वेढून असलेला बेगडी डौल ह्याची वेधक शब्दचित्रे हे ' वेलबुट्टी 'मधील कथांचे एक विशेष दालन म्हणावे लागेल.

' गर्द हिरवे अस्वल ' ही प्रतिकातून साकार झालेली कथा. चांगल्या शहरी वातावरणात वाढलेला शाम आणि सरळसोट बोलभाषेत कडाकडा बोलणारे निसर्गाच्या अर्बुज सहवासात वाढलेले, अस्वलासारखे केस वाढलेले, तशाच रंगाचे, तसेच भांडणारे, मैत्रीनेही एकमेकांना छळणारे खुशाल उर्फ खुसल्या, मुरलीधर धेंडगे उर्फ मुरल्या, सरकाऱ्या भिल्ल आणि डिगू कुलकर्णी या मुलांच्या कृतीउक्तीतून ही कथा रूप घेत जाते. लहान मुलांची दांडगाई, त्यांची भांडणे, स्त्री-पुरुष संबंधाबाबत त्यांच्या मनात रुजू लागलेले हळवे–कोवळे अंकूर. त्यांचा बेबंदपणा व त्यातून निर्माण झालेले भीतीदायक नाटय, जोशींनी समर्थपणे चितारले आहे.

हिरव्यागार झाडीचे, हिरव्याशार पाण्याचे आणि वरवर उद्दाम पण ' त्या ' झाडीत अडकवलेल्या ' शाम 'ची विचित्र अवस्था बघून घाबरलेले व '...फाटीवर लई म्होरं नको जाऊ...मरशील ए.. आता नको जांभळं..ये खाली येतोस का नाही !...काय येडं आहे सालं !..' म्हणून कोवळिकीने–गर्द हिरवेपणाने–आत्मियतेने त्याची विनवणी करणारे, आधी अस्वलासारखी गुदगुल्या करीत मारायला निघालेले, शामचे शाळासोबती त्यांच्या स्वभाववैशिष्टयासह जोशांनी उभे केले आहेत. ' गर्द हिरवे अस्वल ' हे प्रतिक गर्द झाडांचा किर्र निसर्ग, वातावरणाची रौद्रता व मुलांचा क्रूर–प्रेमळ–भित्रेपणा या सगळया बाबतीतच चपखलपणे बसले

आहे, हे या कथेचे वेगळेपण म्हणावे लागते.

'एक बेवकूफपणा' या कथेत कॉलेजियन्सचे विश्व त्यांच्या भाषाधमालीसह आले आहे. उन्हाळा आणि परीक्षा या दोन्ही तापदायक व एकदम येणाऱ्या गोष्टी. बसमधला गोंधळ, गॅदरिंगचा कल्लोळ, पोरींच्या घोळक्यात दाबादाबी, 'मास' कॉन्टॅक्ट आणि आयला, 'माके एल' म्हणजे 'माके लवडे'चा शॉर्ट फॉर्म, चालू ह्या सगळ्या रूढ परिभाषेतून तरुणांचा कंटाळलेपणा प्रभावीपणे मांडला गेला आहे.

'नमस्ते, गोपाळराव गारू' ह्या कथेत ट्रेनिंगसाठी येणाऱ्या, घटकाभर मौजमजा करून कोणाही बांधेसूद मुलीला आपल्यावर लट्टू करण्यासाठी खटपट करणारा आत्मतृप्त आसक्त माणूस त्यांनी उभा केला आहे. ह्या भोगलालसेचे समर्थन करणारे एक सोयीस्कर तत्वज्ञानही गोपाळरावांजवळ आहे. सगळ्या तऱ्हेच्या प्राप्य अशा साधनात व सुखातही वणवण फिरत शिकारी कुत्र्याच्या चाहुलीने मागावर निघणाऱ्या सावध, सभ्य माणसाचे हे चित्र आहे. गोपाळरावाच्या भावनेत कोणतीही उत्कट थरारी नाही. सावध जपणुकीच्या त्याच्या वर्तनामुळे त्याला सर्वस्व द्यायला तयार असलेली, कृष्णकमळीच्या कांतीची, शेजारच्या दुबळ्या मुलाला त्याच्या आडदांड भावाकडून होणाऱ्या मारहाणींमुळे व्यथित होणारी उर्मिला गोपाळरावांच्या मनाशी एकरूप होत नाही. तिच्या आत्मिक प्रेमाला गोपाळराव साद देऊ शकत नाही. इम्पोर्टेड पंख्याच्या राजस वाऱ्यात तिच्या मृत्यूचीही जबाबदारी टाळतात व पैसे चारून बेपत्ता होतात. त्यांचा पळपुटेपणा व पद्मराजू आणि उर्मिलाचा अपमृत्यु वाचकाला विफल बनवितो.

'दादाजी एक व्यक्तिमत्व' या कथेत गृहिणीपदाची जबाबदारी नाकारणाऱ्या, आपल्या उच्चशिक्षित मिळवत्या बायकोला खूष करू पाहणाऱ्या, एके काळी मिलिटरीत असलेल्या, पिळदार पण आता अगतिक व दुबळ्या बनलेल्या पुरुषाची कथा कातर बनविते. पत्नीच्या कर्तृत्वात त्याचे पुरुषत्व चुरमडून जाते. स्वयंपाक करणे, जेवणासाठी वाट बघत थांबणे, तिच्या गंगावनाचा गुंता सोडविणे व तिच्याकडून घालूनपाडून बोलून घेणे अशा तडजोडीत विस्कटलेले हे व्यक्तिमत्व ए. वि. जोशी यांनी दमदारपणे निर्माण केले आहे.

## स्मरणात राहणारी प्यारीबाई

घाटावरची हवा आणि 'मिनी हासते' ह्या दोन कथा एका सूत्रात गोवता येतील. पहिली कथा मोकळ्या निसर्गात बहरली आहे. अडचणीत सापडलेल्या व्यक्तीची कोंडी करून आपली वांछा पूर्ण करण्यासाठी लालचावलेल्या व्यक्तींचे येथें चित्रण आहे. सद्या पाटील, राघू सोनार, पद्या भट यांचे स्वप्नरंजन. खानावळीत वाढणाऱ्या प्यारीबाईला शेजेवर घेण्याची इच्छा बाळगणारे, ती पूर्ण होत नाही म्हणून तिच्या पूर्ण माहीत नसलेल्या पूर्वायुष्यातील भानगडी चवीने चघळणाऱ्या ह्या व्यक्तींची ओळख संवाद–माध्यमातून जोशांनी घडविली आहे. इतकेच

नव्हे तर प्रत्यक्ष तिचा बाप भवरलालही पैशाच्या लोभासाठी मुलीला नवऱ्याच्या स्वाधीन करायला कसा खळखळ करतो आणि नव्या रूपात ती सद्या पाटलाला भेटून–भावाच्या नात्याने विश्वासात घेऊन आपली मनोव्यथा अशी प्रकट करते की, प्यारीबाई ही स्त्री दीर्घकाळ स्मरणात राहते.

'नॉसेन्स फेलोज 'मध्ये डॉ. अवन्तिकाबाई, तिच्या काळ्या गुबगुबीत गालाचा डॉक्टर नवरा व त्याचे व्यसन, बाईची छळणूक, पेशन्टस्नी पाहिलेला शिकलेल्या ह्या लोकांचा तमाशा आणि निवेदक विद्याधर यांची चित्रे बारकाईने काढली आहेत.

## मिनी हसते

'मिनी हसते ' कथेमधील मिनीला दणकट पुरुष सहवासाची ओढ आहे. पण तिला कामापुरता पुरुष नको आहे. लली आपटे ही तिची मैत्रीण नवनव्या पुरुषांना जवळ करते. पण ती अलिप्तही राहते. पण मिनी मात्र त्यात गुरफटत जाते. घरच्या जबाबदारीमुळे व लोकापवादामुळे ती दीर्घकाळपर्यंत मनाचा कोंडमारा करीत असते. पण शेवटी तिला सुखी करणाऱ्या नागभूषण शर्माला ती सर्वस्व अर्पण करते. त्याला शोधण्यासाठी दूरचा प्रवास करते. ह्या परदेशी सैयाच्या मृगजळात मिनी होरपळून निघते. मिनीचे फुललेले मनोविश्व कोमेजून निबर बनते. आपल्याला त्याने घटकाभराच्या मजेसाठी खोटेनाटे सांगून झुलवले, हे त्याची बायकोपोरे व सुखवस्तु समृद्ध संसार बघताना तिला कळून चुकते आणि निघताना सुटणाऱ्या गाडीत भेटीला येणाऱ्या ह्या 'डिसेंट ' माणसाला पाहून मिनीला कडवटपणे हसू येते. 'शेवटी मिनी हसते ' अशी शिर्षकयोजना करून 'अखेर मिनी फसते ' हे संसूचनही लेखकाने साधले आहे.

'जुलम ' ह्या कथेमधील 'प्रमिला ' चैतन्यमय आहे. अफाट व्यक्तिमत्त्वाची, खळखळत्या प्रवाही मनाची, खंबीर, अल्लड व अवखळ अशी ही मुलगी. तिचे लावण्य कोणासही आकृष्ट करणारे आहे. तिच्या मागच्या वर्गात असलेला दिलीप तिच्यावर जीव टाकीत असतो. सहलीला जाताना तिचा अनावर उत्साह तो शोधू शकत नाही. तो अजून अपक्व आहे. प्रमिलेसारखे बेलगाम स्त्रीत्व सांभाळण्यास कच्चा आहे, पण तरी तो आपले उत्कट प्रेम प्रगट करीत असतो. त्याचा निर्मळ भाव जाणून ती एका मर्यादेपर्यंत त्याला जवळ येऊ देते. त्याचे प्रेम जाणूनही साथी बनण्यास तो खूप अपुरा असल्याची प्रमिलेला जाणीव आहे. म्हणून हे बालिश प्रेम आवरून ती लग्नाला दुसऱ्यासोबत तयार असते. निसर्गाच्या पार्श्वभूमीवरील दोन संवेदनक्षम तरुण मनाची स्पंदने जोशांनी प्रवाही भाषेत पकडली आहेत.

'मायडी ' ही एक मनोविश्लेषणाच्या अंगाने जाणारी कथा. 'मायडी ' ही सडसडीत शरीरयष्टी व अत्यंत तेजस्वी लावण्य असलेली मुलगी. निमा आणि सुधा या बहिणी रूपाने सामान्य म्हणून तिचा राग करतात. तिरकस खाजगी लोभी सूरात बहिणीवर आळ घेतात. त्या कुणालाच सापडत नाहीत. त्यांना जमत नाही.

म्हणून आरशात कितीतरी वेळ बघत असतात. 'मायडी' विलक्षण आहे. आपल्यावर लट्टू झालेल्या पुरुषाकडे ती एकटक बघते. ती तशी विक्षिप्त आहे. वाङ्मयाच्या लेखनाच्या विश्वात वावरणारी. मनाच्या प्रेरणेवर ती स्वार झालेली आहे. आपल्याला आवळणाऱ्या उद्दाम मर्दाचा तिला सोस आहे. मनातले हे वादळ तिच्या नाजुक शरीराला पेलवत नाही. तिच्या मागोमाग एकटा एकांतात आलेल्या रखमाजीला ती म्हणते, "तू मला काहीही कर' 'कपडे काढू?" "मारलंस तरी मी ओरडणार नाही!" तो बावरतो. आपण भित्रे नसल्याचा किस्सा तिला ऐकवतो. हुणमशेटची रखेली 'कली' व आपल्याला त्याने एकांतात नागड्या अवस्थेत धरले व मग आपण त्याला 'छातीपत्तोर धरून आपटले' असा आपला पराक्रम सांगतो. सुसंस्कृत घरंदाज नाजुक मुलीचे मनोविकार व रोखठोक आडदांड पुरुषाची समज यातील अनुबोधातून ही कथा ताजेपणा धारण करताना दिसते.

'तोंडात साखर?...हा हा हा...!' ही कथा श्रीमंती, सत्ता आणि रुबाब यांच्या आंदोलनातून बनलेली दिसते. मायदेशाला 'हॉरेचेड अँड रॉटन' समजून वास्तव्य, विवाह आणि 'करिअर बिल्डिंग'साठी परदेशच जवळ करणाऱ्या संस्कृतीची भावस्पंदने येथे टिपलेली आहेत. मुलीने दलपडिया या पारशी गृहस्थाशी सुखाचा संसार थाटला. मुलगा विजय उर्फ जॉय कॅनडात स्थायिक होण्याचा विचार आपल्या पत्रातून वडिलांना म्हणजे साहेबांना कळवतो. त्यांचा भाऊ पारंपारिक पद्धतीचे देशसेवक—'गदाधर' त्यांचा धर्मांतर केलेला मुलगा निळू, साहेबांचा नातू भरतकुमार ह्या लहानमोठ्या व्यक्तींच्या चित्रणातून कथा व्याकुळ मनोवस्थेचे दर्शन घडविते. "गोल्ड स्टँडर्ड आणि बाजारभाव यांचे अवघड, किचकट संबंधदेखील आपल्याला समजतात. पण हे समाधान!" दोघा सख्ख्या भावांच्या भौतिक विरोधातून ही कथा गडद झाली आहे.

## दोन उत्कृष्ट कथा

ह्या संग्रहातील दोन अतिशय सुंदर व नाजूक कथा म्हणजे, "कोणाचे तरी 'आणि वेलबुट्टी' ह्या होत. व्यक्तींचे आयुष्य हेच अकल्पित प्रमेय आहे हा अनुभव ह्या कथांचा केंद्रबिंदू आहे. नेहमीच्या आयुष्यक्रमात जरी सातत्याने तर्कशुद्ध सुसंगती असली तरी त्याच्या अप्रगट मनात असंख्य, असंबद्ध व विद्युततरल अशा भावनिक गुंतागुंतीचा प्रभाव आढळतो. 'वेलबुट्टी'मध्ये असेच घडते. बाळाजीपंत इलेक्ट्रिकवाले, भास्कर पावशे, बाळू व त्याची बहीण, मद्रासी ऑफिसर त्याच्या ऑफिसमधला फाटक, पावशेच्या आकस्मिक मृत्यूने बाळाजीपंताला कितीतरी घटना आठवतात. आईचा मृत्यु. त्यावेळेला केलें दुसऱ्यांनीच. भास्करही असाच अनेकांसाठी करणारा पण त्याचे मृत्यूनंतर करावे लागते इतरांनाच. आयुष्यात अशी अभावित 'साखळी जुळते.' अशा अपघाताने बाळाजीपंताच्या हातात आलेला 'फोटो' त्यातली व्यक्ती व ते दुःखं जपणारा—कुणाचे तरी...कुणीतरी अशी ह्या कथेतील

भावसंगती आहे. ' कुणाचे तरी ' व ' वेलबुट्टी ' या संग्रहातील समर्थ कथा.

ए. वि. जोशी यांची कथा शब्दार्थामधून मानवी मनाचे पिळे सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसते. त्यामुळे ह्या कथेचे यश विलक्षण असले तरी अपेक्षित आहे.

' गोपाळराव गारू 'मधील प्रेयसीच्या भावनाशी तद्रूप न होऊन पळणारा सुसंस्कृत गोपाळराव एकीकडे तर ' मायडी ' कथेत तिच्या ' हिस्टेरिक ' अवस्थेत तिला खांद्यावर टाकून तिच्या घराकडे घेऊन जाणारा अडाणी रखमाजी एकीकडे. निकोप सळसळती प्रमिला हे एक टोक तर रेखीव पण दुबळी धीट ' मायडी ' हे दुसरे.

जोशांची कथा पुरुषांच्या एकाकी दुबळेपणावर तीव्रपणे आघात करते. त्यांची स्त्रीचित्रे विविध व खूप चैतन्यमय आहेत. प्यारीबाई, मिनी, मायडी, उर्मिला, प्रमिला ह्या स्त्रिया ह्यादृष्टीने लक्षात घेता येतील.

त्यांच्या कथांत आलेली मवाली वृत्तीच्या पुरुषाची शब्दचित्रे लक्षणीय आहेत. ' मायडी ' कथेतील रखमाजी–" जाड केसाळ हात, मजबूत खटखटीत जबडा, बारीक केसांचे जड सुरणासारखे डोके अन बारीक डोळे...अस्वस्थ अन रगेल ! " किंवा ' नमस्ते, गोपाळराव गारू 'मधला स्वामी–" मुंडेछाट पैरण, तिरूपती केलेला बोडका चेहरा–कुरूप काळारोम. " ह्या वर्णनांनी ते व्यक्ती उभी करतात.

ह्या संग्रहाच्या यशात कथाकाराच्या लकबीचे व शैलीचेही स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. ' गर्द हिरवे अस्वल 'मध्ये–" पाण्यावर शेवाळी दाट थर होता. त्यावरून परवर्तित होणारी वीत दीड वीत उंचीची मंद पोपटी तेजाळी गप्प अन निश्चल होती. " ' एक बेवकूफपणा 'मध्ये " परीक्षा अन नापास यांची तोंडच मुळी आई अन बापासारखी असतात. केसाळ अन तप्त. ढगळ अन पांढरीफटक. " ह्या वैशिष्ट्यातच हिंदी-उर्दूची भर पडली आहे. ' मंडी, खिलावतो, मकान, गालिज, बेवकूफ आलुबोंडे, पिलव, साली. ' ह्या शब्दाची नोंद करता येईल. ' अन ' हे अव्यय मात्र जोशांनी वैताग येण्याइतके लाडावून वापरले आहे. कधी कर्णदुष्ट पण तर्कसुसंगत शब्दरचनाही ते करतात. " मग पळणे दमले. " " तसा मी काही भावभडक नाही. " " रात्र अधिकाधिक अंधारते. "

निसर्गचित्रण व मानवी मन यांचा काटेकोर समन्वय जोशी साधतात. अनुभवांची गुंतागुंत, साधी स्वच्छ प्रवाही भाषा व बोलभाषेचे वजन ह्या सगळ्याच दृष्टींनी विचार केला तर ' वेलबुट्टी ' हा कथासंग्रह मराठीच्या कथाविश्वात स्वतंत्र व वेगळा आहे असेच म्हणावे लागते.

वेलबुट्टी : ए. वि. जोशी : मौज प्रकाशन : किमत ७–५० रु.

◻ ◻ ◻

संधिसाधु आयाराम-गयारामांनी

# पाडलेली सरकारे

**वा. दा. रानडे**

लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीनंतर गेल्या तीन महिन्यात म्हैसूर, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार व पंजाब या पाच राज्यातील सरकारे गडगडली. त्यापैकी उत्तर प्रदेश व बिहारमध्ये सिंडिकेट आघाडीची सरकारे जाऊन त्या जागी इंदिरा गांधींच्या काँग्रेसचे नेतृत्वाखालील आघाडीची सरकारे अधिकारावर आली आहेत. म्हैसूर, गुजरात व पंजाबमध्ये मात्र राष्ट्राध्यक्ष राजवटी आल्या असून तेथे पुन: निवडणुका होणार आहेत.

गेल्या चार वर्षात अस्थिर राजवटींमुळे राष्ट्राध्यक्ष राजवट लागू करण्याचे निर्णय घेण्याचा प्रसंग राज्यपालांवर अनेकदा आला. अशा प्रसंगी राज्यपालांनी कसे वागावे याबाबत राज्यपाल परिषदातून चर्चाही झाली. याबाबतचे संकेत ठरविण्यासाठी राष्ट्राध्यक्षांनी राज्यपालाची समिती डिसेंबर १९७० ला नेमली. तिचा अहवाल अजून सादर व्हावयचा आहे.

मुदतपूर्व निवडणुकीनंतर ज्या पाच राज्यातील सरकारे गडगडली तेथे राष्ट्राध्यक्ष राजवट आणताना किंवा पर्यायी सरकार बनविताना लोकशाही संकेत कितपत पाळले गेले याचा विचार करताना केवळ राज्यपालांच्या वर्तनाचा विचार करून चालणार नाही, तर सत्तारूढ पक्ष किंवा आघाडी व विरोधी पक्ष किंवा आघाडी यांच्याही वर्तनाचा तसेच केंद्र सरकार आणि राष्ट्राध्यक्ष यांनी घेतलेल्या भूमिकेचाही विचार करणे आवश्यक आहे.

लोकसभा निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यावर थोड्या दिवसातच इंदिरा गांधींच्या काँग्रेसची संधिसाधु आयारामांच्या प्रवेशाची साथच सुरू झाली. या संधिसाधूंना पक्षात सामील करून घेऊन सरकार बनवायचे का याबाबत इंदिरा गांधींच्या पक्षाने सर्वत्र ठाम भूमिका स्वीकारलेली दिसत नाही. पक्षांतर करणाऱ्या सभासदाने विधानसभेचा राजिनामा देऊन परत निवडून आले पाहिजे, हा संकेत सर्व राजकीय

पक्षांनी मान्य करून कसोशीने पाळण्याचेच संधिसाधु पक्षांतराला परिणामकारक आळा बसेल. लोकसभा निवडणुकीत मोठे यश मिळविल्यानंतर यापुढच्या राजकारणाला निकोप लोकशाही वळण लावण्यासाठी इंदिरा गांधींच्या काँग्रेसने वरील संकेत कसोशीने पाळून इतर पक्षांपुढे आदर्श ठेवायला हवा होता. पण दिल्लीची गादी जिंकल्यानंतर जेथे इंदिरा काँग्रेसची सरकारे नव्हती अशा सर्व राज्यात आमच्या हाती सत्ता आणण्याची इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना घाई झाली होती. तेव्हा वरील संकेत त्यांनी सोईस्करपणे गुंडाळून सर्व संधिसाधु आयारामांना आपल्या पक्षात प्रवेश दिला.

उत्तर प्रदेशात २२ मार्चला निरनिराळ्या पक्षांच्या २१ आमदारांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर एक आठवड्यात निर्णायक बहुमत होण्याइतके इंदिरा काँग्रेसचे पक्षबळ वाढले. अविश्वासाचा ठराव पास होण्याची वाट न पाहता सिंडिकेट आघाडीच्या संयुक्त विधायक दल सरकारचे मुख्यमंत्री त्रिभुवन नारायण सिंग यांनी मंत्रिमंडळाचा राजिनामा सादर केला. राज्यपालांनी कमलापति त्रिपाठींना मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितले व त्यांचे मंत्रीमंडळ अधिकारावर आले. त्रिपाठींची अनेक वर्षांची मनीषा पुरी झाली. सिंडिकेट काँग्रेसचा उत्तर प्रदेशचा बुरुज ढासळला.

उत्तर प्रदेशबरोबरच म्हैसूरमध्येही संधिसाधु आयारामांची इंदिरा काँग्रेसच्या पक्षात प्रवेशासाठी झुम्मड उडाली. सतरा मार्चला तीन मंत्री व अनेक राजिनामा देऊन इंदिरा काँग्रेसला मिळाले व त्या पक्षाचे बळ १२० होऊन त्याचे निर्णायक बहुमत झाले. सिंडिकेट काँग्रेसचे मुख्यमंत्री वीरेंद्र पाटील यांनी १८ मार्चला राजिनामा दिला. इंदिरा काँग्रेसचे बळ ५७ वरून १२० पर्यंत वाढले याचा अर्थ मूळ सभासदांपेक्षा संधिसाधु आयारामांची संख्या जास्त झाली. या लोकांच्या पाठिंब्याने सरकार बनवावे की नाही या प्रश्नावर इंदिरा काँग्रेस पक्षात दोन तट पडले. अखेर सरकार न बनविण्याचा आदेश कार्यकारिणीने दिला. कार्यकारिणीने हा आदेश मोठ्या तत्वनिष्ठेने दिला असे नव्हे, पक्षात एकी असती तर उत्तर प्रदेशाप्रमाणे म्हैसूरमध्येही इंदिरा काँग्रेसने सरकार बनविले असते. मंत्रिमंडळ बनविण्याच्या प्रयत्नांसाठी राज्यपाल धर्मवीर यांनी इंदिरा काँग्रेसपक्षास भरपूर अवधी दिला. वीरेंद्र पाटील मंत्रिमंडळाने १७ मार्चला राजिनामा दिला. त्यानंतर दहा दिवसांनी २७ मार्चला राज्यपालांच्या शिफारशीनुसार राष्ट्राध्यक्षांनी म्हैसूरमध्ये राष्ट्राध्यक्ष राजवट जारी केली पण सरकार बनविण्याचे प्रयत्न अजून चालू रहावेत यासाठी विधानसभा बरखास्त न करता स्थगित ठेवण्यात आली. इंदिरा काँग्रेस पक्षाने सरकार बनवू नये असा आदेश कार्यकारिणीने ९ एप्रिलला दिला त्यानंतर आणखी चार-पाच दिवस वाट पाहून १४ एप्रिलला राष्ट्राध्यक्षांनी विधानसभा राज्यपालांच्या शिफारशीनुसार बरखास्त केली. म्हैसूरमध्ये सरकार बन-

विण्यासाठी इंदिरा काँग्रेस पक्षाला अशा रीतीने चार आठवडे संधि देण्यात आली होती. अशाच परिस्थितीत इतर पक्षांना सरकार बनविण्यासाठी एवढी मुदत मिळाली असती काय असा प्रश्न मनात आल्याशिवाय रहात नाही.

म्हैसूरप्रमाणेच गुजरातमध्ये सिंडिकेट काँग्रेसचे सरकार पाडून आपल्या हाती सत्ता आणण्याचे इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांचे प्रयत्न चालू होते. एकोणतीस मार्चला सिंडिकेट काँग्रेसचे १७ आमदार इंदिरा काँग्रेसला मिळाले व हितेंद्र देसाई मंत्रिमंडळाचे बहुमत संपुष्टात आले. दोन दिवसात आणखी तीन मंत्र्यांनी राजिनामे दिले. तेव्हा हितेंद्र देसाईंनी ३१ मार्चला मंत्रिमंडळाचा राजिनामा सादर केला. पण आठ दिवसात हितेंद्रभाईंनी आपली बाज सावरून ८ एप्रिलला दुसरे मंत्रिमंडळ बनविले. दरम्यानच्या काळात इंदिरा काँग्रेसला मिळालेल्या तीन आमदारांना पुन: सिंडिकेट काँग्रेसमध्ये आणण्यात त्यांनी यश मिळविले. मंत्रिमंडळात या तिघांचा समावेश करण्यात आला. मंत्रिपदाचे आमिष दाखवूनच त्यांना पुन: पक्षात आणण्यात आले हे या वरून उघड दिसते. हितेंद्र देसाईंच्या या नव्या मंत्रिमंडळात २६ मंत्री होते. राज्यातील हे आतापर्यंतचे सर्वात मोठे मंत्रिमंडळ होते. मंत्रिमंडळ मोठे करण्यात असंतुष्ट गटांना खूष करण्याचा प्रयत्न होता हे उघड होते. पण संधिसाधु बिनभरवशाचे असतात हा अनुभव हितेंद्र देसाईंना लवकरच आला. इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी पुन: फोडाफोडीचे तंत्र अवलंबिले. १० मेला सिंडिकेट काँग्रेसचे सात आमदार इंदिरा काँग्रेसला मिळाले. तसेच स्वतंत्र पक्षाचे पाच सभासद व एका अपक्ष सभासदाने हितेंद्र सरकारचा पाठिंबा काढून घेतला. दुसऱ्या दिवशी सिंडिकेट काँग्रेसचे आणखी सहा आमदार फुटले. तेव्हा हितेंद्र देसाईंनी आपल्या दुसऱ्या मंत्रिमंडळाचा राजिनामा दिला व विधानसभा बरखास्त करण्याची राज्यपालांना शिफारस केली. राज्यपालांनी १२ मेला विधानसभा बरखास्त करण्याची व राष्ट्राध्यक्ष राजवट लागू करण्याची शिफारस केली. ती मान्य होऊन गुजरातेत राष्ट्राध्यक्ष राजवट आली. इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी हितेंद्र देसाईंचे सरकार पाडले पण स्वत:चे सरकार बनविण्याइतके हुकमी बहुमत मिळविण्यात त्यांना अपयश आले.

## बिहार—शेवटचा बुरूज

बिहार हा सिंडिकेट आघाडीचा शेवटचा बुरूज. तो पाडण्याच्या हालचालींना इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी यानंतर सुरुवात केली. बिहारमध्ये संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष कर्पूरी ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील सिंडिकेट आघाडीच्या संयुक्त विधायक दलाचे सरकार होते. असंतुष्ट गटांना खूष करून आपले मंत्रिमंडळ टिकविण्यासाठी ठाकूर यांनी मंत्र्यांची संख्या ५३ पर्यंत वाढविली. राज्यातील हे सर्वांत मोठे मंत्रिमंडळ होते. तरीही ते फार काळ तग धरू शकले नाही. सत्तारूढ आघाडी फोडण्याच्या इंदिरा काँग्रेस नेत्यांच्या कारवाया चालूच होत्या. ठाकूर मंत्रिमंडळा-

तील नऊ मंत्र्यांनी राजिनामे दिले. भारतीय क्रांतिदल व शोषित दलाने मंत्रिमंडळाचा पाठिंबा काढून घेतला. इंदिरा काँग्रेस पक्षास ३० आयाराम मिळून त्याचे पक्षबळ ११२ पर्यंत वाढले. इंदिरा काँग्रेस कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी, पुरोगामी गट, झारखंड, हुल झारखंड, यांचे गट व शोषित दल हे पक्ष एकत्र येऊन त्यांनी पुरोगामी विधायक दल स्थापले. कर्पूरी ठाकूर मंत्रिमंडळाविरुद्ध एक जूनला विधानसभेत अविश्वासाचा ठराव येणार होता पण आपला पराभव होणार हे उघड दिसू लागल्याने दोन तास आधीच त्यांनी मंत्रिमंडळाचा राजिनामा सादर केला. राज्यपालांनी पुरोगामी विधायक दलाचे नेते भोला पास्वान शास्त्री यांना मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितले व त्यांचे मंत्रिमंडळ ३ जूनला अधिकारावर आले.

सिंडिकेटचे चार बुरूज पाडल्यानंतर इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी आपला मोर्चा आपल्याला अनुकूल नसलेल्या बिगर काँग्रेस सरकारांकडे वळविला. पंजाबमधील अकाली दलाचे बादल मंत्रिमंडळ एका वर्षापूर्वी इंदिरा काँग्रेसच्याच पाठिंब्याने तरले होते पण पंजाबमध्ये लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर आता बादल सरकारला पाठिंबा देण्याची आवश्यकता इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना वाटत नव्हती. अकाली दलातून गुरुनामसिंग गटाला फोडण्यात त्यांनी यश मिळविले. गुरुनामसिंग मुख्यमंत्री असताना बादल यांच्या नेतृत्वाखालील अकालींच्या गटाने त्यांच्याविरुद्ध बंड करून त्यांना खाली ओढले होते. त्याचा सूड म्हणून बादल यांना खाली ओढून पुन्हा मुख्यमंत्री होण्याचा मनसुबा गुरुनामसिंग अनेक दिवस बाळगून होते. गेल्या वर्षी त्यांनी केलेला प्रयत्न फसला. इंदिरा काँग्रेसने त्यांना आयत्यावेळी तोंडघशी पाडले. नंतर निवडणुकीच्या ऐक्याला त्यांचा गट पुन्हा अकाली दलास मिळाला. पण अलीकडे इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी बादल सरकार पाडण्यासाठी त्यांच्याशी पुन्हा संधान बांधले. त्यांच्या नेतृत्वाखाली अठरा सभासदांचा गट फुटला. अकाली दलाचे बहुमत गमावले. बादल मंत्रिमंडळाला राजिनामा देणे भाग पडले. बादल यांनी राजिनामा दिला पण विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस केली. राज्यपाल पावटे यांनी ती तडकाफडकी मान्य करून विधानसभा बरखास्तही करून टाकली. इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्याने आपण मंत्रिमंडळ बनवू हे गुरुनामसिंग यांचे मनसुबे मनातच राहिले.

विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात राज्यपाल पावटे यांनी घाई केली अशी टीका गुरुनामसिंग व इंदिरा काँग्रेसच्या काही नेत्यांनी केली. पावटे यांचा निर्णय त्यांना गैरसोयीचा होता. सत्तेवर येण्याचा त्यांची संधी हुकली या उद्देशानेच या नेत्यांची पावटे यांच्यावरील टीका होती. त्यापूर्वी केरळमध्ये अनेकदा विरोधी पक्षांना पुरेशी संधी न देता राष्ट्राध्यक्ष राजवट लादण्यात आली त्यावेळी याच काँग्रेस नेत्यांची नापसंतीचा किंवा टीकेचा चकार शब्दही काढला नव्हता.

पृष्ठ ४९ वर

केवळ गेल्याच महिन्यात अफरातफर झालेल्या रकमेचा आकडा आहे
१ कोटी रुपये

# जनतेचा बँकांवरील विश्वास उडवू नका !

सुभाष सोनवणे

गेल्या पंधरवड्यात राष्ट्रीयीकृत बँकांमधील अफरातफरीची ५ प्रकरणे उजेडात आली. त्यामधील अफरातफरीची एकूण रक्कम १ कोटीच्या घरात आहे. रक्कमेचे स्वरूप व अल्पावधीत उघडकीस आलेल्या अफरातफरीच्या प्रकरणांची संख्या लक्षात घेता, बँकांचे व्यवहार व कार्यपद्धतीबद्दल आधीच पुरेशी माहिती नसलेल्या जनतेचा संशय वाढण्याची साधार भीति निर्माण झाली आहे.

बँका जनतेच्या विश्वासावर चालतात. तेव्हा हा विश्वास डळमळू लागला म्हणजे बँकिंग व्यवसायच धोक्यात येतो नि विकसनशील देशात तर हे कदापिही परवडणारे नाही. विकसनशील देशातील लोकात बँकांत ठेवी ठेवण्याची सवय बरीच कमी असते. दागिन्यांच्या स्वरुपात व पैसे पुरून ठेवणे वा जवळच साठवणे या सवयीमुळे बरीच मोठी साधनसंपत्ती उत्पादक विकासकार्यासाठी उपलब्ध नसते. परिणामी विकास योजनांसाठी साधनसंपत्ती तोकडी पडते व विकासाचा वेगही फार मोठ्या प्रमाणावर वाढविणे केवळ अशक्य होऊन बसते.

भारतीय अर्थव्यवस्थेस हा अनुभव नवीन नाही. पण साधनसंपत्ती वाढविण्यासाठी—उपलब्ध साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उत्पादक कार्यासाठी वापर करण्यासाठी—जिद्दीने व नेटाने प्रयत्न करण्याची तीव्र जाणीव आपणास अगदी अलीकडच्या काळात झाली आहे. बँकांमधील ठेवी वाढविण्यासाठी बँकांच्या शाखांचे जाळे पसरविण्यास गेल्या २ वर्षांत चांगलीच चालना मिळाली आहे. ज्या भागास बँकांची सोय उपलब्ध नव्हती अशा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या हातात खेळू लागलेला पैसा बँकेत आणण्यासाठी ग्रामीण भागात बँका सुरू करण्यात येऊ लागल्या.

१४ व्यापारी बँकांचे जुलै १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण केल्यानंतर, बँकांच्या शाखांच्या संख्येत बरीच वाढ झाली. समाजातील काही दीनदुबळ्या घटकांना व

अग्रक्रमाच्या कृषि, लघुउद्योगधंद्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाच्या रकमात बरीच वाढ झाली. पण त्या मानाने ठेवीवाढीचा वेग कमी होता.

## ठेवीवाढीत प्रगती होत असताना–

ह्या ठेवीवाढीचा वेग अगदी अलीकडच्या काळात जोमाने वाढू लागला आहे. २७ मार्च १९७० रोजी राष्ट्रीयीकृत बँकांमधील ठेवींनी ५ हजार कोटी रु. ची मर्यादा ओलांडली. तर १४ मे १९७१ रोजी ह्या बँकांमधील ठेवी ६००८ कोटी ४५ लाख रु. एवढ्या होत्या.

ठेवीवाढीत समाधानकारक प्रगती होत असतानाच, अफरातफरीची ही प्रकरणे पाठोपाठ उजेडात आली. बँकेच्या कर्मचाऱ्यांबद्दल लाचलुचपतीच्या तक्रारी आहेतच. त्याखेरीज पुराव्याशिवाय आरोप करण्याची, भोंगळ असे बोलणे–लिहिण्याची सवय आमच्या लोकांना जडलेली आहेच. त्यात 'प्रतिक्रियावादी' (केवळ विरोधाचीच प्रतिक्रिया व्यक्त करणारे) राजकारण्यांची भर व तोंडाला शीण येईपर्यंत बेफाम व भरमसाट आरोप करण्याचा त्यांचा उल्हास! त्यामुळे केवळ राजकीय कारणाने बँकांच्या या अफरातफरीच्या प्रकरणाचे बरेच भांडवल केले जाईल असा रागरंग दिसत आहे.

आता थोडे बँकांच्या अफरातफरीच्या प्रकरणांबद्दल! केवळ जेम्स बाँड अगर पेरी मेसन ह्यांच्या गुप्तहेरकथात शोभेल असे दिल्लीच्या स्टेट बँक कार्यालयातील ६० लाखाच्या अफरातफरीचे सनसनाटी प्रकरण प्रथम बाहेर आले. त्या पाठोपाठ मुंबईतील २ बँकांमधील अफरातफर उघडकीस आली. यानंतर नागपूरच्या एका बँकेमध्ये अफरातफर झाल्याच्या वृत्ताने तेथील जनतेत खळबळ निर्माण झाल्याचे प्रसिद्ध झाले. १९६९ मध्ये युनायटेड कमर्शिअल बँकेने (आता राष्ट्रीयीकृत बँक) 'कॉंग्रेस' पक्षाला दिलेले १५ लाख रु. चे कर्ज बुडीत कर्ज सदरात टाकण्याचा बूट केंद्र सरकारच्या प्रेरणेने निघाला असा आरोप स्वतंत्र पक्षाच्या २ खासदारांनी केला आहे.

मुंबई व नागपूरमधील बँकांच्या अफरातफरी ह्या व्यक्तीगत स्वरुपाच्या आहेत. त्यांची योग्य ती गंभीर दखल घेऊन इतर बँक कर्मचाऱ्यांना व 'साहसी' लोकांना जरब बसण्याऐवजी कठोर शासन त्यांना व्हावेच! पण ह्या केसेस् व्यक्तीगत स्वरुपाच्या असल्यामुळे पक्ष व राजकारणाची त्यात सरमिसळ होण्याचा संभव नाही. म्हणून त्याविषयी मी अधिक लिहू इच्छित नाही.

पक्षीय राजकारणाचा रंग चिकटविल्या जाणाऱ्या बँकांच्या उरलेल्या २ अफरातफरींच्या प्रकरणांचा मात्र गंभीरपणे विचार झाला पाहिजे.

## गूढतेचे वलय व कच्चे दुवे

दिल्लीच्या स्टेट बँकेतील ६० लाख रु. च्या अफरातफरीचे प्रकरण सकृतदर्शनी दिसते त्यापेक्षा किती तरी अधिक गंभीर आहे. ह्या प्रकरणाची ज्या तऱ्हेने व ज्या

वेगाने ' विल्हेवाट ' लावण्यात आली. त्यामुळे यात काही तरी काळेबेरे असावे हा लोकांचा संशय बळावला आहे. तसेच पंतप्रधानांना ' महत्त्वाच्या पण गुप्त कामासाठी ' रक्कम हवी असल्याचे सांगून व तसे पटवून, बँकेची कार्यपद्धती धुडकावून ६० लाख रु. ची रकम तडकाफडकी काढून दिली जाते हा निश्चितच भयानक प्रकार आहे.

या प्रकरणाभोवती गूढतेचे दाट वलय निर्माण झाले आहे. लोकसभेत या संबंधीच्या लक्षवेधी सूचनेवर केंद्रीय अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व उपअर्थमंत्री श्री. के. आर. गणेश ह्यांनी केलेले निवेदन व स्पष्टीकरण यामुळे गूढतेचे दाट वलय मुळीच विरळ झाले नाही.

ह्या प्रकरणाच्या २ अनधिकृत हकीकती प्रसिद्धी झाल्या आहेत. पोलिसांनी यासंबंधी अधिकृतपणे काहीही सांगण्यास नकार दिला आहे, ह्या प्रकरणात काही कच्चे दुवे आहेत. ' सदर रकमेसाठी पतप्रधानांच्या कार्यालयातून टेलिफोन करण्यात आला.', ' स्टेट बँकेत पंतप्रधानाचे गुप्त खाते आहे ' या वृत्ताचा व आरोपाचा संसदेत इन्कार करण्यात आला. तरीही बरेच महत्त्वाचे प्रश्न यातून संभवतात व ते अनुत्तरित राहिले आहेत.

## इंदिराजी, चौकशी का नाही ?

खरे असो वा खोटे असो, पण ह्या प्रकरणाशी पंतप्रधानांचा संबंध येतो. त्यांची जनमानसातील प्रतिमा उजळ व विशुद्ध राहण्यासाठी न्यायालयीन चौकशीची मागणी अर्थमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी का फेटाळली ? बदनाम करण्यासाठी पंतप्रधानांचे नाव या प्रकरणात मुद्दाम गोवण्यात आले असेल तर न्यायालयीन चौकशीनेच हे किटाळ दूर करता आले नसते का ? पक्षांतरासाठी पंतप्रधानांनी राष्ट्रीयीकृत बँकांच्या पैश्याचा वापर केल्याचा आरोप संसदेच्या सभागृहात करण्यात आला असता, पंतप्रधानांनी नेहमीच्याच तडफेने व जोशाने निदान या आरोपाचे तरी का खंडन केले नाही ? अशा प्रसंगी मौन पाळणे ही अपराधाची अप्रत्यक्ष कबुलीच होय अशी लोकांची धारणा होणार नाही का ?

या प्रकरणांतील आरोपी रुस्तुम सोहराब नगरवाला ह्याची जबानी गुप्तपणे का घेण्यात आली ? यास सरकारी वकिलाने आक्षेप कसा घेतला नाही ? ही रक्कम कोणाच्या खात्याची होती ?

या प्रकरणातील सदर राजकीय बाजूपेक्षा बँकिंग कार्यपद्धतीच्या घोर भंगाची बाजू अधिक गंभीर व महत्त्वाची आहे असे मी मानतो. कारण लोकशाहीत श्रीमती इंदिरा गांधी आज पंतप्रधान आहेत, उद्या त्या पंतप्रधान नसतील. पंतप्रधान बदलेल, पण बँकिंग व्यवसाय तसाच राहील. तेव्हा राष्ट्रीयीकृत बँकांमधील कार्यपद्धती बदलली आहे का ? हा असा प्रकार प्रथमच होत आहे का ? ह्यापूर्वी ह्यापेक्षाही अधिक रकमा अशाच तऱ्हेने काढण्यात आल्या तर नाही ना ? ' खास परिस्थिती 'त

या राष्ट्रीयीकृत बँकांचा उपयोग करता यावा म्हणून त्यांच्या कार्यपद्धतीत काही पळवाटा ठेवलेल्या आहेत की काय ? अशा अनेक शंकाकुशंका यासंबंधात निर्माण होतात. त्यांचे सबळ व तात्कालिक निराकरण हवे आहे ते बँकांचा लोकांवरील विश्वास अढळ रहावा व त्याद्वारे बँकिंगची निकोप वाढ होण्यासाठी ?

अफरातफरीच्या या प्रकरणाने बँकिंग व्यवसायाची प्रतिष्ठा धोक्यात आली आहे. सिक्युरिटी प्रेसमध्ये अनधिकृतपणे नोटा छापून स्टेट बँकेत ठेवण्यात येत असाव्यात असा संशय जुन्या काँग्रेसचे नेते श्री. स. का. पाटील यांनी व्यक्त केला आहे. संशय गंभीर स्वरुपाचा आहे. संशय खरा नसेलही. तसा पुरावाही श्री. पाटील यांच्याकडे नसेल. पण संशयाचे एक पिलू सोडून दिले असे म्हणून संशयाचे निराकरण होणार नाही. पक्ष व व्यक्तीच्या प्रतिमेपेक्षा राष्ट्रीयीकृत बँका व सिक्युरिटी प्रेस यांच्यावर जनतेचा अभंग विश्वास राहणे हे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या व चलनपद्धती सुरळीत राहण्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे.

यानंतर स्वतंत्र पक्षाचे खासदारद्वय सर्वश्री के. सी. पंडा आणि सुंदरमणी पटेल यांनी उघडकीस आणलेले दुसरे प्रकरण. काँग्रेस पक्षाला १९६९ मध्ये युनायटेड कमर्शिअल बँकेने दिलेले १५ लाख रु. चे कर्ज ‘ बुडित कर्ज ’ सदरात टाकण्याचा बूट केंद्र सरकारच्या प्रेरणेने निघाला आहे असे त्यांचे म्हणणे ! हे जर खरे असेल तर निश्चितच चिंतनीय आहे. तत्त्वत. कोणत्याही राजकीय पक्षाला—अगदी सत्ताधारी पक्षासहित—बँकांनी मुळीच कर्ज देऊ नये. नि दिले तर ते त्या पक्षाच्या जबाबदार नेत्यांकडून वसूल केले पाहिजे. कारण हा जनतेचा पैसा आहे. आपला पैसा बँकेत सुरक्षित आहे असा विश्वास ठेवीदारास वाटला पाहिजे. तरच बँकिंग व्यवस्था सुरळीत चालेल. म्हणून हे कर्ज बुडीत समजले जाणार नाही असे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी नि:संदिग्धपणे सांगितले पाहिजे.

बँकांत अफरातफरी होऊ नयेत पण झाल्या. तेव्हा त्याविषयी केवळ बोंबाबोंब व आरोपाची धुळवड उडविण्यात ज्यांना मश्गुल व्हायचे त्यांनी खुशाल व्हावे. पण असे प्रकार बँकांत यापुढे कसे होऊ शकणार नाहीत याविषयी अधिक विचार केला पाहिजे असे मला वाटते.

## अफरातफर सोकावली तर --!

भारतातील बँकिंग व्यवसायाचा इतिहास १५० वर्षांपेक्षा फार अधिक नाही. अर्थव्यवस्थेच्या व सर्व थरांतील लोकांच्या विकासाच्या दृष्टीने, साधनसंपत्ती गोळा करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून बँकिंग व्यवसायाचा विकास होण्यासाठी अद्याप भरपूर वाव आहे.

ग्रामीण भागात ट्रेझरीचे काम राष्ट्रीयीकृत बँकांकडे सुपूर्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. ह्या निर्णयाची अंमलबजावणी करताना सरकारने एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी. बारकाईने तपासणी केल्यानंतरच बँकांना मोठी कर्जे

देता येतील असा निर्णय राष्ट्रीयीकृत बँकांच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बैठकीत अलीकडेच घेण्यात आला. हा निर्णय घेतला हे ठीकच झाले. पण १४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर त्यांचे वार्षिक ताळेबंद प्रसिद्ध केलेले नाहीत. यासंबंधी गेल्या वर्षी काहींनी तक्रार केली. पण तिकडे साऱ्यांनीच दुर्लक्ष केले. आता जनता तिकडे दुर्लक्ष करणार नाही. एक-दोन अफरातफरीमुळे भारतातील बँकिंग व्यवस्था कोसळणार नाही, अशा अफरातफरीत थोड्या फार रकमेची झळ पोहोचते त्याचे तितकेसे वाईट वाटत नाही. परंतु म्हणतात ना, म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो ! तेव्हा अफरातफरी सोकावून, जनतेचा विश्वास उडू नये व त्याद्वारे बँकिंग व्यवस्था कोसळून आर्थिक अराजक निर्माण होऊ नये !

□ □ □

---

## आयाराम-गयारामांनी पाडलेली सरकारे

पृष्ठ ४४ वरून

पण पक्षनिरपेक्ष दृष्टीने विचार केला तरी राज्यपाल पावटे यांनी निर्णय घेण्यात घाई केली हे मान्य करावे लागेल. एका सरकारने राजिनामा दिल्यानंतर पर्यायी सरकार स्थापणे शक्य आहे काय हे पाहण्यासाठी इतर पक्षांना पुरेशी संधी द्यावयास हवी. त्यासाठी विधानसभा स्थगित ठेवायला हवी होती. पर्यायी सरकार स्थापन होणे शक्य नाही हे स्पष्ट झाल्यानंतरच विधानसभा बरखास्त करणे योग्य होईल. पावटे यांनी प्रथा पाळल्या नाहीत. त्यांच्यावर याबाबतीत झालेली टीका योग्यच आहे.

एकाच पक्षाला निर्णायक बहुमत मिळत नाही. तोपर्यंत संधिसाधु आयाराम-गयारामांचा संधी मिळून अस्थिर राजवटींचा जमाना असाच चालू राहणार. त्याला आळा घालण्यासाठी संधिसाधूविरुद्ध कडक उपाय योजले पाहिजेत. पक्षांतर करणाऱ्या सभासदाने विधानसभेचा राजिनामा देऊन पुनः निवडून आले पाहिजे. पक्षांतरित सभासदाने किमान एक वर्ष नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडणुकीस उभे रहाता येणार नाही. यासारखे संकेत सर्वपक्षांनी कसोशीने पाळले तरच संधिसाधु पक्षांतराला आळा बसेल. पण झटपट सत्तेवर येण्याची प्रवृत्ती सर्वच पक्षात दिसून येत असता असे संकेत पाळले जाण्याची शक्यता दिसत नाही.

□ □ □

# या साहसगुणांची नितांत गरज आहे असे मला वाटते

मिहीर सेन

आजचे हिंदु राष्ट्र जगाच्या इतके मागे का, यावर विचार करताना 'साहसगुणाचा अभाव' हे कारण मला आढळले. ही साहसी वृत्ती, (Spirit of Adventure) ही अज्ञाताचा शोध घेण्याची धडपड, ही ज्ञानाची, पलीकडे काय आहे ते जाणून घेण्याची तृष्णा, ही शोधून काढण्यास प्रवृत्त करणारी जिज्ञासा आजच्या हिंदु राष्ट्रातून नष्ट झाली आहे. यामुळे गेल्या हजार वर्षांत हिंदु राष्ट्राने जगाला महत्त्वपूर्ण असे फारसे काही दिले नाही. आमचा गेल्या हजार वर्षांचा इतिहास हा मुख्यत्वेकरून परकीयांनी घडविलेला आहे.

मी साऱ्या जगाचा प्रवास केला व भारतातील आजची परिस्थिती पाहून मला खेद वाटला. इसवीसनाच्या पंधराव्या शतकानंतर युरोपात जागृतीची एक नवी लाट उसळली. अज्ञाताचा शोध घेण्याच्या दुर्दम्य इच्छेतून अनेक नवनवीन शोध लागू लागले. या इच्छेतूनच ब्रिटनसारखी राष्ट्रे उदयास येऊ लागली. आम्ही मात्र या पूर्वीच्या आमच्या नेत्रदीपक प्रगतीमुळे सुस्तावलो होतो. जाणून घेण्याची इच्छा नष्ट होत चालली होती. आम्ही केवळ तर्कवादी होत चाललो होतो आणि 'थांबला तो संपला' हा निसर्गाचा कठोर नियम आहे.

प्राचीन काळी या साहसगुणामुळेच हिंदु राष्ट्राची महान प्रगती झाली होती. या प्रगतीचे, साहसगुणाचे, दुर्दम्य महत्त्वाकांक्षेचे पुरावे आजही सापडतात. इंडोनेशियापर्यंत ही महान हिंदु संस्कृती पसरली होती. दुर्दैवाने आमचा हा महान इतिहास आम्ही आज विसरून गेलो आहोत. प्राचीन काळचा हिंदु हा विचारांनी स्वतंत्र होता, मुक्त होता. जेव्हा तो एका ठराविक चाकोरीतूनच विचार करू लागला तेव्हा त्याची प्रगती थांबली. हसणे, प्रेम करणे, झगडणे या गोष्टी आम्ही आजकाल विसरून चाललो आहोत. आमचे पूर्वज या गोष्टी चांगल्या रीतीने जाणत होते.

पूर्वबंगाल आघाडीवरून परतताना वाटेत दोन दिवस कलकत्त्याला थांबलो. कलकत्त्यात बॅरिस्टर मिहीर सेन यांची मुलाखत घ्यायला मी गेलो तेव्हा ' Explorers Club of India 'ची माहिती मिळविणे एवढाच माझा उद्देश होता. परंतु प्रत्यक्ष मुलाखतीत संस्थेच्या स्थापनेचा दिवस, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची नावे, संस्थेची पटावरील सभासदसंख्या इत्यादी रुक्ष तपशीलाच्या गोष्टी विचारायच्या व सांगायच्या राहूनच गेल्या. ही संस्था स्थापन करण्यामागची प्रेरणा, धडपड, तडफड मात्र अडीच तासांच्या या मुलाखतीत बॅरिस्टर मिहीर सेन यांनी माझ्यापुढे साकार केली —

**गजानन मेहेंदळे**

---

आजचे आमचे राष्ट्र हे एक Unsmiling Nation झाले आहे. जीवनावर प्रे करणे आम्ही विसरून गेलो आहोत. त्यामुळे जीवनातील अनेक आनंदापासून आम्ही दुरावत चाललो आहोत. सेक्स, सिगरेट, मद्याचा एखादा चषक या साऱ्या गोष्टींचा आम्ही जणू धसका घेतला आहे. बारीकसारीक बाबतीत नको त्या बंधनात आम्ही स्वतःला जखडून टाकले आहे. परंतु इतिहास अशा क्षुल्लक गोष्टींतून घडत नाही.

आजकाल आपण फार सुरक्षिततावादी झालो आहोत. नवे काही न करण्याची वृत्ती आजच्या भारतात वाढली आहे. हे करू नका, ते करू नका ही बंधने स्वातंत्र्यानंतरही तुटलेली नाहीत. गेल्या हजार वर्षांच्या या केवळ शारीरिकच नव्हे तर वैचारिक गुलामगिरीमुळे आपली प्रगती खुंटलेली आहे. आपल्या मुलांनी शिक्षण कोणते घ्यावे येथपासून ते त्यांच्या लग्नापर्यंत साऱ्या गोष्टी पालक ठरवितात. त्यामुळे स्वतःच्या पायावर उभ राहण्याची वृत्ती नष्ट झाली आहे. आपण आपल्या मुलांचे जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध बनवत नसतो तर केवळ त्यांचे दोन वेळेला पोट कसे भरेल याचीच काळजी करीत असतो. भुताखेतांच्या खोटचा गोष्टी ऐकण्यात आपल्या मुलांच बालपणाच काळ जातो. माझ्या हातात अधिकार असता तर या गोष्टी सांगण्यावर मी प्रथम बंदी घातली असती. मी स्वतः वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत भुताखेतांना भीत असे

यामुळे आजचा भारतीय नागरिक हा भवितव्याच्या दृष्टीने नालायक बनला आहे. रविंद्रनाथांनी कोठेसे म्हटले आहे

"सात कोटी संताने मुग्ध जननी
रेखेचो बंगाली कोरे मानु को ना

(हे दुर्गामाते तू तुझ्या सात कोटी संतानाला बंगाली केलेस परंतु पुरुष केले नाहीस.)

या ओळी केवळ बंगाललाच नव्हे तर साऱ्या भारतालाच आज लागू पडतात. शिवाजी मोठा झाला याचे मूळ त्याच्या आईच्या शिकवणुकीत आहे. साऱ्याच मुलांना शिवाजी होता येणार नाही परंतु आजच्या मातांनी आपल्या मुलांना निदान पुरुष म्हणून जगण्याची संधी दिली पाहिजे. खोट्या कल्पनांच्या बंधनात त्यांना जखडून न ठेवता त्यांच्यातील साहसगुणांना वाव दिला पाहिजे.

मनुष्यामनुष्यांतील, समाजासमाजातील, राष्ट्राराष्ट्रांतील फरकांचे मूळ साहस-गुण हे आहे. संस्कृती ही साहसाची, सामर्थ्याची सहचरी आहे. भारतामध्ये इंग्रजी संस्कृती आली याचे कारण ती संस्कृती आपल्यापेक्षा श्रेष्ठ होती, हे नव्हे तर इंग्रज विजयी झाले व आपण पराभूत झालो हे आहे. महत्त्वाकांक्षी, साहसी माणसांमुळेच राष्ट्र मोठें होते.

विज्ञानाच्या प्रगतीसाठीदेखील साहसगुणाची आवश्यकता आहे. न्यूटनने सांगितलेला नियम आईनस्टाईन खोडून काढतो, आईनस्टाईनने सांगितलेला नियम हॉईल-नारळीकर खोडून काढतात. आजचे सिद्धान्त, आजची सत्ये ही दहा वर्षांनंतर खरी असतातच असे नाही. ज्या राष्ट्रात ही जिज्ञासेची ज्योत सतत जळत राहते, अधिकाधिक प्रखर होते ते राष्ट्रच विज्ञानात असामान्य प्रगती करते.

## यासाठी आमचा क्लब

भारताच्या प्रगतीसाठी ज्या साहसगुणाची नितांत गरज आहे असे मला वाटले. शोधून काढण्याच्या या इच्छेचे प्रवृत्तीचे, महत्वाकांक्षेचे साहस हे दृश्य स्वरूप आहे. या गुणाची जोपासना करण्यासाठी Explorers Club of India " ही संस्था स्थापन केली आहे. निरनिराळ्या प्रकारच्या साहसांना आम्ही नेहमी प्रोत्साहन, उत्तेजन देत असतो. आम्ही आमच्या तरुणांना फक्त पाच रुपये व ' एक्सप्लोअरचे 'चे एक प्रशस्तीपत्रक देऊन हिच हायकिंगला किंवा सायकलवरून दूरवरच्या सफरींना पाठवतो. त्याच्या सामाजिक स्थानापासून आम्ही त्याला थोड्या वेगळ्या वातावरणात पाठवितो. आम्ही त्याला या विशाल विश्वाला सामोरे जाण्यास शिकवितो. तुमच्या बऱ्यावाईटाला दुसरे कोणी जबाबदार नाही तर तुम्ही स्वतःच जबाबदार आहात ही जाणीव यातून तरुणांच्या मनात निर्माण होते. ही मुले हिचहायकिंग करताना पैसे देऊन अन्न विकत घेत नाहीत किंवा पैसे देऊन वाहनात बसत नाहीत. आम्ही या मुलांना जनतेचा एक अविभाज्य भाग म्हणून जगण्यास शिकवतो, जनतेच्या सदिच्छासागरात मुक्त विहार करण्यास शिकवितो.

मध्यंतरी आम्ही चार मुलींना कलकत्त्यापासून 'दिशा 'पर्यंत १२० मैल अंतर हिचहायकिंग करत पाठविले. एका आठवड्यात त्यांनी हा प्रवास पूर्ण केला. आणखीही अनेक मलींना आम्ही शकडो मैल अंतर हिचहायकिंग करत पाठविले.

भारतीय जनतेच्या सुसंकृतपणावर, सभ्यतेवर माझा पूर्ण विश्वास आहे. या मुलींना वाटेत कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही. अनेक ट्रक ड्रायव्हर्सनी त्यांना लिफ्ट दिली. वाटेत आपल्याबरोबर जेवण्याचा आग्रह केला व शक्य तितक्या चांगल्या हॉटेलात जास्तीत जास्त चांगले जेवण घेतले. या प्रवासांतून या मुलींनी केवळ आपला देशच नव्हे तर आपले देशबांधवही जवळून पाहिले. आपल्या देशात हिच-हायकिंगची पद्धत अद्याप रुजलेली नाही. परंतु आमचा असा अनुभव आहे की, खेड्यातील लोकांचे हिचहायकिंगला पूर्ण सहकार्य मिळते.

गेल्या फेब्रुवारी महिन्यात आमचे तीन तरुण कलकत्त्यापासून काश्मीरपर्यंत सायकलवरून गेले. त्यापैकी दोघांना एक पाय नव्हता व एकाला एक हात न हता. तीन हजार किलोमीटर्सचा हा प्रवास त्यांनी बेचाळीस दिवसात पार पाडला

१९६९ साली ड्यूक व पिनाकी चटर्जी या आपल्या तरुणांनी शिडाच्या होडीतून भारताच्या किनाऱ्यापासून अंदमानापर्यंत प्रवास केला. वरकरणी आमच्या या सफरीतून आम्हाला काही फायदा झाला नसेल. परंतु It was a spiritual exercise through physical means.

लवकरच ओरिसापासून बाली बेटापर्यंत व तेथून परत भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर भडोच बंदरापर्यंत असा दहा हजार मैलांचा प्रवास आमचे तरुण शिडाच्या जहाजांतून करणार आहेत. प्राचीन काळी आमचे साहसी व्यापारी दूर-वरच्या सफरी करीत असत. त्या सफरींची कल्पना यावी हा या प्रवासाचा उद्देश आहे. आमच्या प्रत्येक साहसामागे काही निश्चित उद्दिष्ट असावे, काहीतरी शोधून काढण्याची, सिद्ध करण्याची धडपड असावी असा माझा आग्रह असतो. केवळ एका बिंदूपासून दुसऱ्या बिंदूपर्यंत प्रवास करणे एवढेच आमचे मर्यादित उद्दिष्ट नसते.


माझ्या जीवनाचे व संस्थेचे तत्त्वज्ञान साहसाच्या जाणून घेण्याच्या या प्रवृत्तीत सामावलेले आहे. आमचे ध्येयवाक्य आहे The Religion and destiny of man is to know.

□ □ □

---

माणूस–१९ जूनच्या अंकात प्रसिद्ध झालेला 'तो दिवस' हा पूर्व बंगाल आघाडीवरचा लेख गजानन मेहेंदळे यांचा आहे. सुहास मेहेंदळे हे नाव चुकीने छापले गेले. –सं.

---



मिळवा
4%
4 टक्के
करमुक्त व्याज मिळवा
टपाल कचेरींतील बचत बँक
खात्यावर
ठराविक रक्कम 2 किंवा 3 वर्षे
ठेवल्यास
4½% टक्के
राष्ट्रीय बचत संघटना
70/683

नीला पाटील

# रंगभूमी

## मंजू । मंजू

अाय. एन. टी. चे तुफान विनोदी नाटक

'प्रीति परी तुजवरती' व 'धुम्मस' या दोन यशस्वी नाटकांनंतर, इंडियन नॅशनल थिएटरने श्री. शं. ना. नवरे यांचे 'मंजू मंजू' हे नाटक तितक्याच अभिजात निर्मितीमूल्यांसहित रंगभूमीवर आणले आहे. रविवार दि. १३ जून रोजी मुंबईच्या साहित्य मंदिरात या नाटकाचा पहिला दणकेबाज प्रयोग झाला.

'तुझं नि माझं जमेना परी तुझ्यावाचूनी करमेना' अशा एका जोडप्याची ही नाट्यकथा आहे. मंजूच्या तिरकस बोलण्याला विटून, प्रकाशक असलेल्या, बुद्धिवादी प्रकाशने तिच्याशी घटस्फोट घेतलेला असतो. प्रियवंदा नावाच्या दुसऱ्या एका श्रीमंत बापाच्या तरुण लेकीच्या प्रेमात पडल्याची 'भावना' त्याला होत असते. पण मंजूला द्याव्या लागणाऱ्या पोटगीच्या खर्चामुळे हा नवा संसार ओढगस्तीत कसा उभारायचा, असा घोर त्याला पडलेला असतो. तशात इन्कमटॅक्स अधिकारी त्याच्यामागे लागलेले असतातच.

इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना करून द्यावयाचे स्टेटमेंट तयार करण्यासाठी प्रकाश, त्याचा जिवलग मित्र शशी याला घरी बोलावतो. प्रकाश व मंजू यांच्यात पुन्हा एकोपा व्हावा, ही इच्छा असलेला शशी मंजूला प्रकाशच्या फ्लॅटवर बोलावतो नि नाटकाला सुरुवात होते.

जुन्या हिशोबाच्या वह्या चाळताना प्रकाश-मंजूच्या वैवाहिक जीवनातील सुखद स्मृतींना उजाळा मिळतो, मृदू भाव जागृत होतात. पण त्याच वेळी दोघांच्याही एककल्ली स्वभावामुळे ते पुन्हा हमरातुमरीवरही येतात. प्रकाशची जिरवायला मंजू मुद्दाम स्वरूपकुमार या नटाबरोबर संध्याकाळी बाहेर पडते व पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकात मंजू व स्वरूपकुमार पिक्चरहून प्रकाशच्या घरी परत येतात. भावी नवीन पत्नी प्रियंवदा हिच्याबरोबर लोणावळ्याला जायचा प्रकाशचा बेत, तिची मोटार बिघडल्यामुळे ऑफस होतो आणि तोही घरी परततो. एकेकाळची प्रेयसी व पत्नी मंजू घरात असताना, तिथे रात्र काढायची कशी, या विचाराने

प्रकाश अस्वस्थ होतो. तशात स्वरूप-कुमाराने चोरून पाजलेली व्हिस्की चढल्यामुळे मंजू त्याला कुजके-तिरके बोलून हैराण करते. तिच्या सौंदर्याची नशा आपल्यावर चढत आहे, ही भेदरून-टाकणारी जाणीव होताच प्रकाश तसाच रात्री घराबाहेर पडतो. आणि त्याच्यामध्ये अजूनही जीव गुंतवून बसलेली मंजू 'यापुढे कधी मी कुजकं बोलणार नाही' असा रडत-रडत निर्धार करते, येथे दुसरा अंक संपतो.

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस प्रियंवदा प्रकाशकडे येते व तिची मंजूशी भेट होते. मंजू व प्रकाश रात्रभर एकत्र होते, त्या कल्पनेने, मत्सराने तो प्रकाशजवळ संशय व्यक्त करते आणि प्रियंवदेशीही आपले जमू शकणार नाही, याचा प्रकाशला साक्षात्कार होतो. त्या गडबडीत तो टॉनिकच्या गोळ्या समजून झोपेच्या गोळ्या घेतो नि त्यांचा अंमल त्याच्यावर होऊ लागतो. प्रियंवदेलाही त्याचे आपल्यावर प्रेम नाही, हे उमजते.

मंजूला कलकत्त्याला न्यायला आलेल्या स्वरूपकुमारला पिटाळून प्रकाश मंजू-जवळ आपली चूक कबूल करतो. त्याचा व्यवहारी, बुद्धिवादी स्वभाव न पटणारी, भावनाशील मंजूही, आपल्याला त्याची अजून ओढ आहे, हे मान्य करते. पुन्हा मंजूबरोबरच नव्याने संसार करण्याची उमेद झोपेची झांपड डोळ्यांवर आलेला प्रकाश 'मंजू मंजू लवकर लवकर परत-परत ये-ये, तुझा प्रकाश.' अशी साद घालून व्यक्त करतो. मंजू विरघळते नि तीन तासाचे हे धमाल नाटक संपते.

श्री. शं. ना. नवरे यांनी, श्री. भरत दवे यांनी लिहिलेल्या या मूळ गुजराती नाटकाचे रूपांतर सरस केले आहे. नाटकातील खुसखुशीत संवाद प्रेक्षकांना तीन तास खळाळून हसवितात.

आय. एन. टी. च्या कुशल कलावंतांमुळेच हे नाटक सर्वसामर्थ्याने रंगभूमीवर आले आहे. त्रस्त नवरा प्रकाश सतीश दुभाषींनी, हितचिंतक मित्र शशी सतीश रणदिवे यांनी, अवखळ प्रियंवदा मीना सुखठणकरनी आणि प्रेमकुमार हा एक्ट्रॉ नट स्वरूपकुमार या नवोदित नटाने चांगले उभे केले. मंजूची 'टायटल रोल'ची भूमिका सरिता या 'धुम्मस' फेम नटीने समर्थपणे साकार केली. पण अतिशय बोलका चेहरा, व आकर्षक शरीरयष्टी लाभलेल्या या कुशल अभिनेत्रीचा आवाज कानाला अत्यंत कर्कश लागतो. तिने किमान शब्दांची फेक तरी सौम्यपणे करण्याची मेहनत करावी.

प्रवीण जोशी यांचे सफाईदार दिग्दर्शन लाभलेल्या या नाटकाला, श्री. विजय कापडियांचे सुरेख देखणे नेपथ्य लाभले आहे. ऐषआरामी प्रकाशचे सुखवस्तू घर त्यांनी चांगले दाखवले आहे. तिसऱ्या अंकातील प्रियंवदेच्या वेषभूषेमुळे या नाट्य-वस्तूला परदेशी वातावरणाचा वास मारतो.

'प्रीति परी,' घेतलं शिंगावर' यासारख्या प्रेक्षकांना खळाळून हसविणाऱ्या नाटकांच्या परंपरेतील हे नाटक चांगलीच गर्दी खेचेल. ☐ ☐ ☐

अ. वि.
पारगावकर



# रंगू बाजारला जाते

काय पहायचं हो या चित्रात ?

परवा ' रंगू बाजारला जाते ' चित्रपट पाहिला. संपूर्ण चित्रपट पाहिला आणि मी निराश झालो. एखाद्या चांगल्या चित्रपटाला आर्थिक मदत, तसेच त्याचा जास्त प्रसार व्हावा म्हणून तो चित्रपट टॅक्स फ्री करत असावेत अशी एक माझी भाबडी समजूत होती. तसे टॅक्स फ्रीने मला बरेच धोके दिलेले आहेत. पण विचार केला, ग्रामीण चित्र आहे तेव्हा ते टॅक्स फ्री तरी कशासाठी केले ते पहावे.

तुम्हा कोणाला त्यात टॅक्स फ्रीच्या खाणाखुणा सापडतात का पहा. कथा अशी आहे. एक वारकऱ्याची चिमुरडी पोर भक्तिगीते म्हणून वृद्ध वडील व स्वतःचे पोट भरत असते. तिच्या भक्तिगीतांवर गर्दीतील एक तमासगीर (त्यासाठी तिच्या तोंडी एक भक्तीगीत – मीरा गिरीधर गोपालाची...घातले आहे) खूष होतो. हा रंभाजी त्या पोरीला पळवून स्वतःच्या गावी आणतो. तिला तो बळ-जबरीने नाच–गाणे शिकवून मोठी करतो. तिला फडात उभी करून धुळं, जळगाव, सांगली, कोल्हापूर गाजवायचे अशी त्याची आकांक्षा असते. ह्या रंगूवर त्याची संपूर्ण सत्ता असते. तिच्याकडे डोळा वर करून पहाण्याची कोणाची हिम्मत नसते. कारण रंभाच्या ' फरशी 'शी गाठ असते. मामाकडे लहानाचा मोठा झालेला श्रीरंग पाटील अनेक वर्षांनी आपल्या गावी परत येतो. त्याची आणि रंगूची ओळख होते. ही वळख वाढत असलेली पाहून रंभा भडकतो. तो रंगूला मारहाण करतो आणि श्रीरंग पाटलाला त्याच्या फरशीचा इंगा दावण्याचे तो ठरवतो. रंगू जाचाला कंटाळून जीव द्यायला निघते. तिथे श्रीरंग तिची वाटच पहात असतो ! तो तिला वाचवतो आणि आपल्या मामाच्या गावाला घेऊन येतो. रस्त्यात रंभा आणि त्याची माणसं त्याला गाठतात. मग मारामारी. श्रीरंग, रंभाला बेदम मारून घरी येतो. त्याचा मामा, पोरानं तमाशातली पोर घरात आणली म्हणून प्रथम नाराज होऊन आणि नंतर आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरं वगैरे तत्त्वज्ञान रंभाला सुनवून पांडुरंगाचा हवाला देऊन रंगूला सून म्हणून मान्य करतो. इथे खरी कथा संपायला

हवी. पण अजून बराच वेळ उरला होता म्हणून गाडी पुढं दामटली असावी. श्रीरंगवर वॉरंट निघाल्याचे मामांना कळते. त्याने रंभाचा खून केला असा त्याच्यावर आरोप असतो. रंगू आणि श्रीरंग लग्न होऊन गावाबाहेर जातात. श्रीरंग मामाच्या सल्ल्याने जंगलात बंदूक घेऊन फरारी होतो. पोलीस त्याच्या मागावर असतात. एके रात्री श्रीरंग रंगूला भेटायला येतो. तिथे एक मारेकरी रंगूवर फरशी चालवणार एवढ्यात श्रीरंग त्याच्या हातावर गोळी झाडतो. त्या आवाजाबरोबर श्रीरंगच्या मागावरील पोलीस तिथे येऊन त्याला अटक करतात. (हा रंगूचा मारेकरी म्हणजे रंभा. तो श्रीरंगबरोबरील मारामारीत जखमी होतो पण श्रीरंगवरील सूडासाठी गुपचूप गुप्त होतो. त्यामुळे रंभाच्या खुनाचा वहीम श्रीरंगवर येतो.) शेवट सगळा गोड होतो. रंगूला तिचे वडील सापडतात.

असे हे कथानक. इतर ग्रामीण चित्रांपेक्षा काय वेगळे आहे ह्यात. पूर्वी अशी गल्लाभरू चित्रं अनेक येऊन गेली. त्याच श्रृंगारिक लावण्या-नृत्ये, तेच ठराविक ग्रामीण वातावरण पाहून आता हे ग्रामीण चित्रपट नको असे वाटू लागले आहे. आता नव्याने पुढे आलेला बहुजन समाज, त्याच्या आवडीनिवडीचे प्रतिबिंब मराठी चित्रपटातून पडणे सहाजिक आहे. आतापर्यंत पांढरपेशा वर्गाचे प्रश्न प्रामुख्याने चित्रपटातून मांडले जात. आता झालेला हा फरक योग्य आहे. परंतु त्यात वास्तवतः किती आहे ?

सध्या ग्रामीण चित्रपटातून दाखवले जाणारे ग्रामीण जीवन वास्तव ग्रामीण जीवनापेक्षा फारच वेगळे. किंबहुना शहरात बसून रंगवलेले ते एक कल्पनारम्य जीवन असते. मी अनेक लहानमोठ्या खेड्यातून हिंडलो आहे. माझे आजोळ आणि माझे मुळ गावही खेड्यात असल्याने मी बरेच वेळा खेडेगावात गेलो आहे. पण जन्म शहरात गेल्याने सहाजिकपणे मी ग्रामीण जीवनाकडे कुतुहलाने पाहत आलो आहे.

त्यामुळे चित्रपटातला विषयवासनेने सदा पछाडलेला आकडेबाज मिशांचा दुष्ट पाटील, त्याच्याकडे असलेली बंदूक, गावावर त्याचे असलेले जबरदस्त वर्चस्व असा पाटील पाहिला की वाटते आपले चित्रपटवाले अजूनही फार जुन्या काळात वावरत आहेत. आजचा पाटील बहुधा फाटक्या अंगाचा, साध्याच पेहरावाचा, आपल्या कामात गर्क असलेला दिसतो. गावाच्या आणि शेतीच्या सुधारणांच्या कामात तो गर्क असतो. त्याला अशा 'बारा भानगडी' करायला वेळही नसतो आणि तशी त्याची परिस्थितीही नसते. पण मराठी ग्रामीण चित्रातून मात्र एकाच ठराविक साच्याचे ग्रामीण जीवन रंगवलेले दिसते.

कथेच्याबाबत तर बोलायची सोयच नाही. ग्रामीण कथा म्हटली की एक नमुना ठरून गेला आहे. त्यात थोडेफार प्रसंगांचे फरक केले की नव्या चित्रपटाची कथा तयार केली जात असावी, इतका सारखेपणा ह्या ग्रामीण चित्रपटातून दिसतो.

इथे एक विचार मनात येतो की इंग्रजीमध्ये नोबेल प्राईज विजेत्या आणि मोठमोठ्या लेखकांच्या कादंबऱ्यांवरून अनेक चित्रपट काढले जातात आणि ते गाजतातही. फॉर हुम द बेल टॉल्स, पेटन प्लेस, द ओल्ड मॅन अँड द सी, डॉ. झियागो अशी अनेक नावे सांगता येतील. आपल्याकडे कुंकू, डॉक्टर, विद्या असे काही चित्रपट निघाले. आज मराठीत श्री. ना. पेंडसे, आनंद यादव, विजय तेंडुलकर असे असंख्य नावाजलेले लेखक असूनही त्यांची नावे चित्रपटातून अजिबात दिसत नाहीत. हे मराठी चित्रपटाचे आणि रसिकांचे केवढे दुर्दैव !

- मराठी चित्रपटातून दिग्दर्शक ही सुद्धा अशीच एक अनावश्यक उपाधी असावी ! त्याचे अस्तीत्व कधीच पहायला मिळत नाही. मराठी चित्राला तांत्रिक अंगे तरी असतच नाहीत. (हिंदी चित्रपटात तांत्रिक अंग ही तरी एक जमेची बाजू असते.) ह्या सर्वांमुळे प्रत्येक शॉटमध्ये इतक्या चुका असतात की त्या सांगत बसलो तर त्यांची एक मालीकाच होईल. ह्या सर्वातून अभिनय हा एक प्रकार रहातो. मराठीत अगोदरच नाव घेण्यासारखे नट-नटी एक किंवा दोन. शिवाय ग्रामीण चित्राला अभिनयाची आवश्यकताच नसावी बहुधा !

ही जी मराठी चित्रपटाची सर्व बाजूंची शोकांतिका आहे ही 'रंगू बाजारला जाते' मध्ये सुद्धा नेहमीच्याच तडफेने दिसते.. हा चित्रपट टॅक्स फ्री बहुधा श्री. वसंतराव दादा पाटील ह्यांच्यामुळे झाला असावा ! कारण त्यांना हे चित्र अर्पण केले आहे. उद्या एखादे चित्र आणखी कुणाला अर्पण करून मराठी चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पारितोषिकेसुद्धा मिळतील अशी आशा करायला हरकत नाही.

मध्यंतरी हिंदी चित्रपट निर्मात्यांनी काही मराठी चित्रपट काढले. जिव्हाळा, कलावंत विकणे आहे, क्षेप इ. परंतु तेही आर्थिक आणि कलात्मक अशा दोन्ही बाजूंनी पडले आज प्रादेशिक भाषेतून चित्रपट काढणारा सत्यजीत रे सारखा माणूस जगात नाव. कमावतो हे पाहून मराठी माणसाला किती दुःख होत असेल ! मी सत्यजीत रे ह्यांचे पथेर पांचाली, को पुरुष ओ महापुरुष असे काही बंगाली चित्रपट पाहिले आहेत. त्यांच्या चित्रपटातील कथेशी ठेवलेले इमान, आटोपशीरपणा, वास्तवता प्रत्येक दृश्य अधिक बोलके करण्याची हातोटी पाहून, भाषा समजत नसूनही त्यांचे चित्रपट मनावर प्रभाव पाडून जातात. आमच्या मराठी चित्रपट दुनियेला आपल्याच देशातील ही व्यक्ती ठाऊकही नसावी !



श्रीमती लक्ष्मीकांतम्मा मात्र म्हणाल्या, 'पण तुम्ही जुन्या मंडळींच्या पक्षनिष्ठेविषयी तरी काही खात्री देता येईल का ?'

खरं आहे. गुंटूरला डी. संजीवय्याच नाही का म्हणाले, 'माझ्या पक्षातील नव्वद टक्के सभासदांना पक्षनिष्ठा नाही !'

आता हे नव्वद टक्के कोणते आणि दहा टक्के कोणते हे न विचारणेच बरे. संजीवय्याही ते सांगणार नाहीत. सुरक्षिततेसाठी.

### थोडे विषयांतर

दिल्लीच्या आकाशवाणी केंद्रासमोर एक पानवाला आहे. भलता इंदिरानिष्ठ होता. इतका की गिरी राष्ट्राध्यक्ष झाल्याचे जाहीर होताच पठ्ठयाने दिवसभर लोकांना फुकट कोकाकोला दिला.

आता इंदिरा गांधींचे नाव काढलं की चिडतो. त्याच्या दुकानावर पान घ्यायला जा आणि सहज विषय काढा. तो कुठून तरी एक कात्रण काढून तुम्हाला दाखवतो. त्यात त्याचे नाव आहे. गेल्या एप्रिलमध्ये 'पंतप्रधानांशी बातचित' कार्यक्रमात निरनिराळ्या क्षेत्रातील सामान्य लोकांना टेलिव्हिजनवर प्रश्न विचारण्याची संधी दिली होती. याने सांगितले, 'तुमच्या बँक राष्ट्रीयीकरणाने माझ्यासारख्या गरीबाचा फायदा काय झाला ? बँकवाले सिक्युरिटी मागतात, ती गरीब कुठून देणार ? ज्यांच्याजवळ ती आहे ते श्रीमंतच आहेत. तेच पुन: पैसा कमविणार ?'

बाईंनी प्रश्न टाकला. म्हणाल्या, 'मैने तो सुना है कि पानवाले बहुत पैसा कमाते है !'

बस, तेव्हापासून गडी बिथरून आहे. आपल्या व्यवसाय बंधूचा अपमान झाल्याने इतर पानवालेही 'हमारी इंदिराजी' म्हणणे टाळतात म्हणे !

□ □ □

# विनामूल्य

सव्वाशे रुपये किमतीच्या
दहा दर्जेदार पुस्तकांची
विनामूल्य भेट

**माणूसची ५ वर्षांची**
**१०० रुपये वर्गणी**
**भरल्यास**




ही दहा
दर्जेदार पुस्तके
विनामूल्य
भेट मिळतील.

---

**किंवा....**

---

किंवा

# १०० रुपये

पाच वर्षांसाठी
राजहंस प्रकाशन संस्थेकडे

## ठेव म्हणून

ठेवल्यास
सव्वाशे रुपये किंमतीची
सलामी योजनेतील
ही दहा दर्जेदार पुस्तके
ठेवीदारास मिळतील.
आणि
पाच वर्षानंतर
शंभर रुपयांची ठेवही
परत मिळेल.

पुरंदरच्या बुरुजावरून
झुंड
नाझी भस्मासुराचा उदयास्त
अग्निपुत्र
व्होल्गा जेव्हा लाल होते
संध्याकाळ
आणि ड्रॅगन जागा झाला
सांगते ऐका
मुक्ताफळे
प्रभात

# योजनेसंबंधी आणखी थोडे

'साप्ताहिक माणूस'ची पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी १५ ऑगस्ट १९७१ पर्यंत भरणाऱ्यास पाच वर्षे 'माणूस' अंक व योजनेतील दहाही पुस्तके मिळतील.

---

'माणूस'चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील पाच वर्षासाठी शंभर रुपये वर्गणी भरून या सलामी योजनेत सहभागी होऊ शकतील.

---

पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावे. सोबतच्या पत्रात 'सलामी योजना' असा खुलासा असावा.

---

ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे. सोबतच्या पत्रात 'सलामी योजना' असा खुलासा असावा.

---

रक्कम चेकने पाठवणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

---

योजनेतील पुस्तके दोन गटात प्रकाशित होतील: पहिला पाच पुस्तकांचा गट डिसेंबर १९७१ अखेर व दुसरा सुमारे पुढील वर्षाच्या मध्यास (जून–जुलै १९७२) वर्गणी-ठेवीदारांच्या हाती पडेल.

---

टपाल व पॅकिंग खर्च वर्गणी-ठेवीदार यांचा राहील.

## सलामी योजनेतील पुस्तके

अंदाजे मूल्य

### पुरंदरच्या बुरुजावरून
ब. मो. पुरंदरे
१०.००

### झुंड
अनुवाद अनंत भावे
१५.२०

### नाझी भस्मासुराचा उदयास्त
वि. ग. कानिटकर
२५.००

### अग्निपुत्र
वसंत पोतदार
१४.००

### सांगत्ये ऐका
हंसा वाडकर
८.००

### आणि ड्रॅगन जागा झाला
अरुण साधू
१२.००

### संध्याकाळ
गजानन जागिरदार
८.००

### प्रभात
शरद गोखले
७.००


### मुक्ताफळे
ग्यानबा
१०.००

### व्होल्गा जेव्हा लाल होते
वि. स. वाळिंबे
१८.००

साप्ताहिक माणूस / राजहंस प्रकाशन / १०२५ सदाशिव पुणे ३० / फोन ५७३५१

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise Regd. No. M-H 649



"वऱ्हाडी मंडळींच्या पिण्याच्या पाण्यासाठी ह्या येथे हे धरण बांधायचं; त्याच्याखाली विजेसाठी हे पॉवरहाऊस अन् त्याना रहाण्यासाठी येथे टेकडीवर हवेशीर वसाहत घ्यायची ...मुहूर्त केव्हाचा धरलाय साहेब ? ..."